दैनिक बीड
पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

लछत्तीसगडमध्ये ४० नक्षलवादी ठार

गडचिरोली : छत्तीसगडच्या दंतेवाडा-नारायणपूर सीमावर्ती भागातील दक्षिण अबूझमाडमध्ये शुक्रवारी सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत ४० नक्षलवादी ठार झाले. रात्री उशिरापर्यंत ही चकमक सुरू होती. घटनास्थळावरून मोठा शस्त्रसाठाही हस्तगत करण्यात आला आहे. अलिकडच्या काळातील ही सर्वांत मोठी कारवाई असून यामुळे माओवादी चळवळीला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे. गडचिरोलीपासून सुमारे अडीचशे किलोमीटर दंतेवाडा आणि नारायणपूर जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात दक्षिण अबूझमाडमध्ये काही नक्षलवादी दबा धरून बसल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. त्यानुसार दोन्ही जिल्ह्यांच्या सुरक्षा यंत्रणांनी संयुक्तपणे शोधमोहीम हाती घेतली होती. त्यावेळी नक्षलवाद्यांनी अचानक गोळीबार सुरू केला. जवानांनी जोरदार प्रत्युत्तर दिल्यानंतर अनेक तास चकमक झडली.

बीड | रविवार,दि.६ ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक६५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यासह देशभरात रिपाइं कार्यकर्त्यांची फार मोठी ताकद असून भाजपाला सत्तेत येण्यासाठी रिपाइंच्या ताकदीची गरज आहे. येणाऱ्या विधानसभेत भाजपाने रिपाइंला २० जागेवर वाटा देण्याचे काम करावे.तसेच राखीव मतदार संघातील जागेवर रिपाइंचा हक्क असून केजची जागा देखील रिपाइंच्या हक्काची आहे. असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे, यांच्या नेतृत्वात बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर आयोजित भव्य -दिव्य सत्कार सोहळ्यात केले.

मंत्री रामदास आठवले म्हणाले केज विधानसभेच्या जागेवर रिपाइंचा हक्क

भाजपने रिपाइंच्या ताकदीला सत्तेत वाटा द्यावा

रिपाइंची प्रचंड ताकद जिल्ह्यात ठरणार निर्णयाक | पप्पु कागदेंना तिकीट मिळाल्यास १०० टक्के विजय

बीडमध्ये आठवलेंचा रेकॉर्डब्रेक सत्कार सोहळा

रॅलीत निळ्या वादळाचे शक्ती प्रदर्शन

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा बीड शहरात शनिवारी ऐतिहासिक सत्कार सोहळा पार पडला. सोहळ्यापूर्वी राजुरीवेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत भव्य-दिव्य रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत रिपाइंच्या कार्यकर्त्यांनी निळ्या वादळाचे शक्ती प्रदर्शन केले.युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या तगड्या नियोजनातून मंत्री रामदास आठवले यांचा बीड येथील भव्य-दिव्य सत्कार सोहळा ऐतिहासिक ठरला आहे.

पप्पु कागदे यांनी दाखवून दिली रिपाइंची ताकद

मंत्री रामदास आठवले म्हणाले की, मी केंद्रात तिसऱ्यांदा मंत्री झाल्यामुळे माझे राज्यभर अनेक सत्कार सोहळे झाले. परंतु बीड जिल्ह्याचे लोकनेते पप्पू कागदे यांनी माझा सत्कार सोहळा ऐतिहासिक करून माझा सत्कार भव्य-दिव्य केला. बौद्ध, मांग,चर्मकार, मराठा, मुस्लिम समाजाला न्याय देण्याचे काम करणारे आम्ही आहोत. संविधान बदलण्याची ताकद कुणाच्या बापात नाही, संविधानासाठी गोरगरीब समाजासाठी व उपाशी पोटी राहणाऱ्या माणसांसाठी आम्ही काम करणारे माणसे आहोत. दलित पँथरपासून बीड जिल्हा माझा बालेकिल्ला आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे ही माझी मागणी दलित पँथरपासून आहे. मंडल आयोग लागू करण्यासाठी संघर्ष करण्याचे काम मी पँथरच्या माध्यमातून केले आहे. नामांतराच्या लढ्यात गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन यांचे फार मोठे योगदान होते. मराठा समाजाच्या पाठीशी आम्ही आहोत. भाजपाने रिपाइंच्या राज्यभरातील ताकदीचा विचार करून भाजपाने आम्हाला सत्तेत वाटा दिला पाहिजे. भाजपला सत्तेत यायचे असेल तर रिपाइंला २० जागा देऊन त्यात केज मतदार संघाची जागा द्यावी. मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी स्वर्गीय विनायकराव मेटे यांनी सदैव संघर्ष केला. बीड जिल्ह्यात आल्यावर गोपीनाथ मुंडे व प्रमोद महाजन यांची आठवण आल्याशिवाय राहत नाही. पप्पू कागदेमुळे माझ्या पाठीशी ताकद आहे. त्यामुळे केज आमदार करण्यासाठी मी ताकद लावणार आहे. असे प्रतिपादन मंत्री रामदास आठवले यांनी केले.

ऐतिहासिक भव्य सत्कार सोहळ्याचे स्वागताध्यक्ष युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे म्हणाले की, दिन दलित, शोषित, पीडित, उपेक्षितांना न्याय देण्याचे काम रामदास आठवले दलित पँथरपासून करीत आहेत. मराठवाडा विद्यापीठ नामांतर, मंडळ आयोगाचा लढा उभा केला.ओबीसींना न्याय देण्याचे काम रिपाइंच्या माध्यमातून करीत आहेत.

पान २ वर...

बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार!

बैठक: अर्जुन खोतकर म्हणाले अनिलदादा मुख्यमंत्र्यांचे अत्यंत विश्वासू

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिवसेना नेते संसदरत्न खासदार मां. डॉ श्रीकांत शिंदे साहेबांचा बीड विधानसभा संवाद दौरा विजयाकडे घेऊन जाणारा ठरला पाहिजे. बीड मतदार संघ शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेला आहे आणि सध्या सर्वात जास्त अनुकूल परिस्थिती आहे त्यामुळे बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार यात शंका नाही.जिल्हाप्रमुखामध्ये अनिलदादा जगताप मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या अत्यंत जवळचे आणि विश्वासू आहेत. दादांच्या कार्य पद्धतीवर शिंदे साहेबांचा विश्वास आहे. दादांना शिंदे साहेबांकडे विशेष आदर सन्मान आहे. आपल्याकडे दोन माहीने राहिलेत. येणारे दोन माहीने पक्षाला द्या. रात्रीचा दिवस दिवसाची रात्र करा. बीड मतदार संघावर आपली चांगली पकड आहे, आपण बाळासाहेबांचे शिवसैनिक आपल्याला आहोत त्यामुळे येणारी निवडणुका

पान २ वर...

मी घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात: जगताप

खूप दिवसांपासून अन्याय सहन करतोय. प्रत्येकवेळी मला थांबवण्यात आले व माझा पाय ओढण्यात आला. मात्र आता मी आता घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात आहे. बीड मतदार संघावर शिवसेनेचा भगवा फडकवायचा आहे. कार्यकर्त्याला मोठं करण्यची, त्यांना ताकद देण्याची दानत मुख्यमंत्री शिंदे साहेबांमध्ये आहे व शिंदे साहेबांचा आशीर्वाद, विश्वास आणि पाठबळ माझ्यासोबत आहे म्हणून मला यावेळी कसलीच चिंता राहिली नाही. शिवसैनिकांनो, अफवांवर विश्वास ठेऊ नका बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार आहे. त्यामुळे कामाला लागा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड विधानसभा संवाद दौरा पूर्व नियोजन बैठकीत आपल्या शिवसैनिक पदाधिकाऱ्यांना केले.

मंतीमंद मुलीवर चौघांचा अत्याचार!

संवेदना:अवघ्या दोन तासात तिघांना ठोकल्या बेड्या

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत गावामध्ये एका २५ वर्षीय मतीमंद, मुकबधीर मुलीवर चौघांनी बलात्कार केल्याची घटना शुक्रवार दि.४ रोजी उघडकीस आल्याने खळबळ उडाली. या संदर्भात अंभोरा पोलिस ठाण्यात चार जणांविरुध्द पोउपनि देवीदास सातव यांच्या फिर्यादीवरुन गुरनं -२४६/२०२४ कलम-६४ (२) (आय)(जे) ७०भारतीय न्याय संहितेप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अंभोरा पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, शुक्रवार दि.४ रोजी सपोनि मंगेश साळवे यांना एका गावामध्ये २५ वर्षीय मतीमंद, मुकबधिर मुलीवर बलात्कार झाला असल्याची गोपनीय माहिती फोनवरुन मिळाली. त्या अनुषंगाने सपोनि साळवे यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ पोउपनि देवदास सातव, पोलिस अंमलदार सुदाम पोकळे यांना घटनास्थळी पाठवले, तेथून २५ वर्षीय मतीमंद, मुकबधीर मुलीसह तिच्या आईकडीलांना पोलिस ठाण्यात आणून त्यांना घडलेल्या घटनेची माहिती देऊन तक्रार नोंदवणेबाबत सांगीतले. मात्र पिडीतेच्या आईवडीलांनी तक्रार देण्यास नकार दिला. सदर घटनेची माहिती सपोनि साळवे यांनी पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी कमलेश मिना यांना दिली. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पिडीतेची तात्काळ बलात्काराच्या अनुषंगाने वैद्यकीय तपासणी करुन सरकार तर्फे पोउपनि

पान २ वर...

वेतन अंदोलनाचा तिढा सुटेना

तडजोड: सरपंच ४ लाख अनामत देण्यास तयार

सिरसाळा /पुण्यभूमी प्रतिनिधी

थकीत व चालू वेतना साठी सिरसाळा ग्रामपंचायत कर्मचारी दिनांक ३० सप्टेंबर रोजी पासुन ग्रामपंचायत कार्यालय समोर बेमुदत काम बंद आंदोलनास बसले आहेत, आज अंदोलनाचा सातवा दिवस आहे. अद्याप ह्या अंदोलनाचा तिढा सुटला नाही,काल बीडीओ नागरगोजे यांनी या ठिकाणी अंदोलन कर्त्यांना भेट दिली व सकारात्मक चर्चा केली ,याच बरोबर सरपंच अन्वर पट्टेदार यांनी तडजोड करत ४ लाख रुपये अनामत देण्याचे कबूल केले मात्र ग्रामपंचायत कर्मचारी थकीत २८ लाख रुपयातील पन्नास टक्के म्हणजे १४ लाख रुपये वेतन अदा करावेत या मागणीवर ठाम राहिले आहेत.परवा दिवसभर सरपंच अन्वर पट्टेदार,गटविकास अधिकारी नागरगोजे, ग्रामसेवक आजबे अंदोलन कर्त्यां सोबत चर्चा करत होते. मात्र यावर तोडगा निघाला नाही . आज घडीला ग्रामपंचायतीची आर्थीक परिस्थिती खराब

पान २ वर...

वैयक्तिक चार लाखाची तरतूद करतो

पंधराव्या वित्त आयोगातून वेतनासाठी खर्च करता येत नाही,चौदाव्या वित्त आयोगाच्या उपलब्ध निधीचे व्याज रक्कम तरतूद करता येईल, व्यावसायिक गाळ्यांचे तीन /चार लाख रुपये देखील येणे बाकी आहे .सद्या चालू चार महिण्यांचे ४ लाख रुपये अनामत जमा करतो व इतर मार्गाने मिळणा-या उत्पन्नातून पुन्हा थकीत वेतन रक्कम दिली जाईल. सगळेच वेतन दिले ही असते परंतु ग्रामपंचायत कडे पुरेसा निधी/पैसा नाही, ह्या सर्व बाबी अंदोलका सोबत चर्चील्या आहेत.व प्रमुख पदाधिकारी या नात्याने अंदोलन कर्त्यांच्या मागणीचे मला गांभीर्य आहे असे सरपंच अन्वर पट्टेदार यांनी म्हटले आहे .

पडघम | निवडणुकीत कोणते मुद्दे ठरले महत्वाचे?

एक्झिट पोलमध्ये भाजपाला धक्का!

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि काँग्रेसमध्ये जोरदार रस्सीखेच पाहायला मिळाली होती. मतदान पार पडल्यानंतर आज (५ ऑक्टोबर) एक्झिट पोल समोर आले आहेत. आता ८ ऑक्टोबर रोजी विधानसभेचा निकालही समोर येणार आहे. मात्र, त्याआधी आज एक्झिट पोल समोर आले आहेत. जवळपास सर्वच एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार, हरियाणात भारतीय जनता पक्षाला धक्का बसण्याची शक्यता आहे, तर १० वर्षांनंतर काँग्रेस सत्तेत येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

इंडिया टुडे-सीव्होटरच्या एक्झिट पोलनुसार, विधानसभेच्या ९० जागांपैकी काँग्रेसला ५०-५८ जागांवर विजय मिळण्याची शक्यता आहे, तर न्यूज २४ चाणाक्यच्या पोलनुसार, काँग्रेसला ५५ ते ६२ जागा मिळण्याची शक्यता आहे. टाईम्स नाऊच्या पोलनुसार काँग्रेसला ५० ते ६४ जागा मिळणार असल्याचा अंदाज आहे. तसेच इंडिया टीव्हीच्या पोलनुसार काँग्रेसला ५९ जागा मिळतील असा अंदाज आहे.हरियाणा विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने उमेदवार उभे केले होते. तसेच अरविंद केजरीवाल यांनी विविध ठिकाणी प्रचाराच्या सभाही घेतल्या. मात्र, समोर आलेल्या एक्झिट पोलच्या

पान २ वर...

निवडणुकीत कोणते मुद्दे महत्वाचे ठरले?

हरियाणा राज्यातील विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांचे प्रश्न, तरुणांच्या अग्निवीर योजना, राज्यातील बेरोजगारी आणि पैलवानांचा मुद्दा या विषयांवरून काँग्रेसने भाजपावर टीकेची झोड उठवली होती. त्यामुळे हे मुद्दे काँग्रेससाठी महत्वाचे ठरले. तर भाजपासाठी अडचणीचे ठरले. हरियाणा एक प्रमुख कृषी राज्य आणि भौगोलिकदृष्ट्या राजधानी नवी दिल्लीच्या जवळ असल्यामुळे महत्त्वपूर्ण आहे. शेतकरी आंदोलनामुळे भाजपाला अनेकदा शेतकऱ्यांच्या रोषाला सामोर जावं लागल्याचंही पाहायला मिळालं. त्यामुळे हे मुद्दे भाजपासाठी अडचणीचे ठरल्याचंही बोललं जात आहे. मात्र, असं असलं तरी निकालानंतर कोणत्या पक्षाला किती जागा मिळतात हे पाहणंही महत्वाचं ठरणार आहे.

तिरुपती लाडूच्या गुणवत्तेत सुधारणा!

प्रशंसा : मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांचा दावा

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

तिरुमाला येथील भगवान व्यंकटेश्वर मंदिरातील 'लाडू प्रसाद'ची गुणवत्ता वाढल्याबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केल्याचा दावा आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी शनिवारी केला. तिरुमाला येथील 'तिरुमाला तिरुपती देवस्थान'द्वारे (टीटीडी) स्थापन केलेल्या 'वकुलमथा' या मध्यवर्ती स्वयंपाकगृहाचे उद्घाटन मुख्यमंत्री नायडू यांच्या हस्ते करण्यात आले.

पान २ वर...

सध्याचे सरकार कोणतीही भेसळ सहन करणार नाही. भगवान बालाजीच्या पावित्र्याचे रक्षण करण्यासाठी 'टीटीडी' वचनबद्ध आहे. 'टीटीडी' आणि सरकारही भगवान बालाजी किंवा श्री व्यंकटेश्वर स्वामींच्या पवित्रतेचे आणि पावित्र्याचे रक्षण करण्यासाठी येथे आहे. हीच आमची बांधिलकी आहे. आम्ही आमचे सर्वोत्तम प्रयत्न करू.

- एन. चंद्राबाबू नायडू, मुख्यमंत्री, आंध्र प्रदेश

भारत दुसऱ्या क्रमाकांवर

बांगलादेशविरुद्ध दोन कसोटी सामन्यांची मालिका जिंकून भारतीय क्रिकेट संघाने आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या दिशेने वाटचाल सुरू केली. सध्या या टेस्ट चॅम्पियनशिपच्या क्रमवारीत भारत दुसऱ्या क्रमाकांवर असून ऑस्ट्रेलिया प्रथम स्थानी आहे. शेजारचा श्रीलंका तिसऱ्या क्रमाकांवर आहे. श्रीलंका संघही त्यांच्याविरोधातील कसोटी सामने जिंकत आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये खेळण्यासाठी आपला दावा मजबूत करत आहे. बांगलादेशविरुद्धचा दुसरा कसोटी सामना जवळपास रद्द झाल्यातच जमा होता. त्यामुळे चॅम्पियनशिपमधील भारताच्या वाटचालीवर अडथळे निर्माण होण्याची भीती निर्माण झाल्याने भारतीय खेळाडूंच्या छावणीवर चिंतेचे सावट होते; परंतु तब्बल पावणेतीन दिवसांचा खेळ पावसामुळे, अंधुक प्रकाशामुळे वाया गेलेला असताना खेळ झाला तरी सामना अनिर्णित राहणार हे जवळपास सर्वांनीच गृहीत धरले होते; परंतु नियतीच्या व भारतीय क्रिकेट संघाच्या नशिबी काही वेगळेच लिहिले होते.

पावणेतीन दिवसांचा खेळ वाया गेल्यावर भारतीय संघ वेगळ्याच जिद्दीने खेळला. 'हारी बाजी को जितना आता है हमे', अशा थाटात भारतीय संघाने मैदानात वावरून बांगलादेशला सव्वादोन दिवसांच्या खेळात पराभवाची धूळ चारली. पहिला डाव बांगलादेशचा गुंडाळल्यावर भारतीय संघाने आक्रमक खेळ करत शतकाच्या जवळपास जात आघाडी घेतली व त्यानंतरही बांगलादेश संघाला दुसऱ्या डावात झटपट गुंडाळत भारताचे दुसऱ्या डावात पुन्हा आक्रमक खेळत सात विकेटने बांगलादेशला पराभूत करत मालिका व सामनाही जिंकला. क्रिकेट हा अनिश्चिततेचा खेळ असला तरी सामना जिंकण्याचा निर्धार, गोलदांज व फलंदाजांच्या परिश्रमाला क्षेत्ररक्षकाची साथ मिळाल्यावर अशक्यही शक्य करून दाखवता येते, हे भारतीय संघाने बांगलादेशविरोधातील दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यात जगाला दाखवून दिले.

भारतीय क्रिकेट संघ आज कागदावर बळकट असला तरी पूर्वी ते चित्र नव्हते; परंतु सुरुवातीच्या काळात वेस्ट इंडिज, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया या संघाच्या तुलनेत भारतीय क्रिकेट संघ प्रभावशाली नसला तरी त्या त्या काळातील भारतीय क्रिकेट संघाने व त्यातील खेळाडूंनी जगाला आपली दखल घेणे भाग पाडले होते. १९७५, १९७९चा एकदिवसीय विश्वचषक संघ विजेत्या वेस्ट इंडिजला त्या काळात थोपविणे अशक्यप्राय होते. फलंदाज व गोलंदाज याबाबतील वेस्ट इंडिज त्या काळात मातब्बर संघ होता. वेस्ट इंडिजच्या गोलंदाजीचा तोफखाना मैदानावर नुसता आग ओकणारा होता. अशा वेस्ट इंडिजला आसमान दाखवित भारतीय क्रिकेट संघाने तिसऱ्या विश्वचषक स्पर्धेमधील विजेतेपदावर आपले नाव कोरले होते. जे ऑस्ट्रेलिया, इंग्लंडला जमले नव्हते, ते भारतीय संघाने १९८३ साली विश्वचषक स्पर्धेत करून दाखवले होते. टी-२० विश्वचषक असो किंवा वन डे सामन्यांचा विश्वचषक असो. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी असो किंवा जागतिक कसोटी विजेतेपद असो. भारतीय संघाला गेल्या ११ वर्षांत सर्वोच्च यशाची चव चाखता आलेली नाही. भारताने ४१ वर्षांपूर्वी प्रथमच आयसीसी ट्रॉफी जिंकली होती. तेव्हा कपिल देव यांच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने १९८३ च्या विश्वचषक स्पर्धेवर नाव कोरले होते. तब्बल दोन दशकानंतर भारतीय संघाला आयसीसीचे जेतेपद मिळाले होते.

२००२ मध्ये श्रीलंकेसोबत भारताने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीवर नाव कोरले. पावसामुळे चॅम्पियन चषकाच्या फायनलमध्ये पावसाने हजेरी लावली होती. मुसळधार पावसामुळे हा सामना अनिर्णित सोडण्यात आला. त्यामुळे दोन्ही संघाला संयुक्त जेतेपद देण्यात आले. त्यानंतर ५ वर्षांनंतर महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने २००७ टी-२० विश्वचषक जिंकून इतिहास रचला. अशा प्रकारे टीम इंडियाने तिसऱ्यांदा आयसीसी ट्रॉफी जिंकली. २०११ मध्ये भारतात झालेल्या वनडे विश्वचषकात एमएस धोनीच्या नेतृत्वाखालील भारत संघाने श्रीलंकेचा पराभव करत चषकावर नाव कोरले. त्यानंतर अवघ्या दोन वर्षांनंतर झालेल्या चॅम्पियन ट्रॉफीवर भारताने नाव कोरले. त्यावेळीही संघाची धुरा एमएस धोनीच्या खांद्यावर होती. धोनीच्या नेतृत्वात भारतीय संघाने वनडे वर्ल्डकप, टी-२० वर्ल्डकप आणि चॅम्पियन ट्रॉफीवर नाव कोरले आहे. भारताकडे दोन वनडे वर्ल्डकप, एक वेळा टी-२० वर्ल्डकप आणि दोन वेळा चॅम्पियन ट्रॉफीवर नाव कोरले. २०१३ नंतर भारतीय संघाला आयसीसी चषकावर नाव कोरता आलेले नाही.

एकच शिक्षकांच्या खांद्यावर विद्यार्थ्यांचे ओझे!

दुर्लक्ष:ग्रामस्थांनी दिला आंदोलनाचा इशारा

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

एकीकडे महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खाते विभागाणे जिल्हा परिषद शाळांना डिजीटल शाळा करा, पटसंख्या वाढवा, गुणवत्ता वाढवा असे प्रोत्साहन देत आहेत तर दुसरीकडे प्रगती केलेल्या शाळांना बक्षीस देखील देत आहेत. परंतू ज्या शाळांनी बक्षीस घेतले, गुणवत्ता टिकवली, ग्रामस्थ व ग्रामपंचायतचं शाळाच्या सुधारणेसाठी योगदान लाभलं अशा असलेल्या गेवराई तालुक्यातील मनुबाई जवळा केंद्र रामपुरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिली ते पाचवी पर्यंतचे वर्ग असतांना व दोन शिक्षकांची मान्यता असतांना सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकाची अद्याप जागाच भरली नाही. गावचे सरपंच व ग्रामस्थ गट शिक्षण विभागाकडे खेटे घालत आहेत. पण जि.प. शिक्षण विभागाला घाम फुटला नाही त्यामुळे अशा शाळा बंद करण्याचं कट कारस्थान तर नाही ना अशी शंका नागरीक घेवू लागले आहेत. या संदर्भात मनुबाई जवळा ग्रामपंचायतचे सरपंच तसेच लिंबाजी वैराळ, भगवान वैराळ, सुनिल खरात, दिलीप सगळे, अशा जवळपास पन्नासावर ग्रामस्थांनी शिक्षकाच्या मागणीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड यांना निवेदन दिले असून चार दिवसात शिक्षक द्यावा अन्यथा १६ ऑक्टोबरला शाळेला कुलूप ठोकण्यात येईल असा इशारा देवून सर्व विद्यार्थी व ग्रामस्थ आपल्या कार्यालयासमोर उपोषणास बसतील असे नमुद देखील केले आहे.

प्राप्त माहिती नुसार सदर शाळा सुधारण्यासाठी सरपंचांनी खूप प्रयत्न केले ज्यामध्ये माजी खा. संभाजी महाराज यांनी २० लाख रूपयांचा निधी दिली त्यामधून भव्य शाळा उभारली. अशा शाळेत पहिली ते पाचवी पर्यंत पटसंख्या ३० ते ४० असतांना प्रमेश्वर सगळे हे एक शिक्षक ३१ मे २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले तेव्हा पासून ही दोन शिक्षकी शाळा एक शिक्षकावर चालवली जात आहे. तर जि.प. कडून रिक्त जागा दाखवली जात असतांना पद भरले नाही. त्यामुळे सरपंचाने स्वखचने तात्पुरता पगारी शिक्षक नेमला आहे.

या संदर्भात सतत विनंत्या करून देखील तसेच ग्रामपंचायतने ठराव देवून देखील शिक्षक भरलेला नाही. विशेष म्हणजे शाळाची प्रगती पाहुन तत्कालीन बीडीओ कांबळे यांनी भेट दिल्यानंतर पन्नास हजार रूपयाचे शासकीय सहकार्य देखील केले. अशा शाळेत दोन ऐवजी एकच शिक्षक काम करीत असेल व शिक्षकाची रिक्त जागा मागणी करूनही भरली जात नसेल तर ग्रामस्थांच्या सहकार्यातून इमारतीसह शिक्षणाच्या बाबतीत उत्कृष्ट ठरलेल्या शाळा अशा पध्दतीने

अंगणवाडीची देखील तीच गत...

मनुबाई जवळा येथे अंगणवाडी असून तेथील अंगणवाडी सेविका ३१ मे २०२३ रोजी सेवानिवृत्त झाल्या. परंतू ही रिक्त जागा भरली नाही. तर वयस्कर असलेल्या मदतनीस महिला एकट्याच अंगणवाडी सांभाळतात. अंगणवाडीला अंगणवाडी सेविका द्यावी म्हणुन बालविकास अधिका-याकडे मागणी करूनही या मागणीकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष केले गेले आहे. मनुबाई जवळा येथील शाळा व अंगणवाड्या बंद करायच्या आहेत काय? असा सवाल देखील ग्रामस्थांनी केला व १५ ऑक्टोबर पर्यंत शिक्षक दिला नाही तर नाईलाजाने १६ तारखेला शाळेला कुलूप लावून विद्याथ्यर्थ्यांसह पालक शिक्षण विभागासमोर उपोषण करतील असा इशारा दिला आहे.

पान एक वरून

भाजपने रिपाइंच्या ताकदीला

मराठा समाजाला आरक्षण देण्याची भूमिका रिपब्लिकन पक्षाची आहे. १९९० साली समाज कल्याण मंत्री असताना रामदास आठवले यांनी गोरगरिबांना २ लाख हेक्टर गायरान जमिनी देण्याचे काम केले आहे. आम्ही रिपाइंचे २४ तास काम करणारे कार्यकर्ते आहोत. अन्याय अत्याचारावर आवाज उठवून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम करणाऱ्या केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा सत्कार सोहळा आम्ही बीडमध्ये ऐतिहासिक केला आहे.रिपाइंची बीड जिल्ह्यात फार मोठी ताकद आहे. आमचे खच्चीकरण करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्याला धडा शिकविल्याशिवाय राहणार नाहीत.असे पप्पू कागदे म्हणाले. याप्रसंगी मिलिंद शेळके,अड ब्रह्मानंद चव्हाण,अशोक गायकवाड, परशुराम वाडेकर, बाबुराव कदम यांनी विचार व्यक्त केले. यावेळी राजू जोगदंड, माझहर खान, सचिन कागदे, भास्कर रोडे, अशोक साळवे, किशोर कांडेकर, किसन तांगडे, अविनाश जावळे, महादेव उजगरे, अरुण भालेराव, धोंडीराम सिरसाट, दीपक कांबळे, नरेंद्र जावळे, दशरथ सोनवणे,महेश आठवले,गोवर्धन वाघमारे, लक्ष्मण सिरसाट, दासू वाघमारे, उत्तम मस्के, अरुण निकाळजे, बापू पवार, दशरथ शिंदे,ज्ञानोबा माने, सुरेश माने, सादिक कुरेशी, संदिपान डोंगरे, अविनाश जोगदंड, अरुण कांबळे, प्रभाकर चांदणे, सुभाष तांगडे, विलास जोगदंड, भैय्या मस्के, योगेश गायकवाड, श्याम वीर, अक्षय कोकाटे, महेंद्र वडमारे, भाऊसाहेब कांबळे, सतीश शिंगारे, रतन वाघमारे, नामदेव वाघमारे, यांच्यासह हजारो महिला व कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अड.सुरेश वडमारे, प्रा.बाळासाहेब गव्हाणे यांनी केले.

बीडची जागा शिवसेनेलाच

मोठ्या ताकदीने लढावी लागणार आहे असे प्रतिपादन शिवसेना उपनेते तथा मराठवाडा संपर्कनेते अर्जुनजी खोतकर साहेब यांनी केले. संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांचा येत्या ८ ऑक्टोबर रोजी बीड विधानसभा संवाद दौरा मेळावा संपन्न होणार आहे. याच अनुषंगाने काल दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी दु. ३.०० वाजता दरम्यान बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे शिवसेना उपनेते तथा मराठवाडा संपर्कनेते अर्जुनजी खोतकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मेळाव्याच्या पूर्व तयारीसाठी बैठक पडली. या बैठकीमध्ये अर्जुनजी खोतकर साहेब यांनी खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब बीड मतदार संघात पहिल्यांदा येत असून त्यांच्या संवाद दौरा मेळाव्या बाबत महत्वपूर्ण सूचना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, येणारा काळ शिवसेनेचा आणि शिवसैनिकांच्या भगव्याचा असून महाराष्ट्रावर भगवा फडकविण्यासाठी एकजूट होऊन ताकदीने विधानसभा निवडणूक लढवायची असल्याचे सांगितले. बीडची जागा ही शिवसेनेची आहे व ती शिवसेनेलाच सुटेल यात शंका नाही असे त्यांनी सांगितले. यादरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी देखील उपस्थितांना संबोधित केले व दोघांनी मिळून बीड मतदार संघात शिवसैनिक पदाधिकाऱ्यांना येणाऱ्या अडचणी समस्या अर्जुनराव खोतकर यांच्यासमोर मांडल्या. या बैठकीसाठी बीड जिल्हा शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, सर्व अंगीकृत संघटनेचे आजी- माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंतीमंद मुलीवर चौघांचा

देवीदास सातव यांच्या फिर्यादीवरुन अंभोरा पोलिसात चौघाच्या विरोधात गुरनं -२४६/२०२४ कलम-६४ (२) (आय)(जे) ७०भारतीय न्याय संहितेप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला सदरचा गुन्हा हा अत्यंत संवेदनशील गंभीर स्वरुपाचा असल्याने या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन त्यांना गजाआड करण्यासाठी सपोनि साळवे, पोउपनि सातव, पोलिस हवालदार मुकूंद एकसिंगे, बाबुराव तांदळे, भरत माने, संतोष राठोड, मनोज खंडागळे, महिला पोलिस छाया साप्ते, पोना अमोल ढवळे, प्रशांत कांबळे, पोलिस अंमलदार शिवदास केदार, सतीश पैठणे, अमोल सिरसाठ, सुदाम पोकळे, चालक पडवळ यांनी तात्काळ आरोपींचा शोध घेऊन या गुन्ह्यातील दोघा जणांच्या अवघ्या दोनच तासातच मुसक्या आवळून गजाआड केले असून, उर्वरित फरार दोघांचा शोध घेण्यासाठी विशेष पोलिस पथक नेमण्यात आल्याचे सपोनि मंगेश साळवे यांनी सांगीतले.

अवघ्या दोन तासात तिघे नराधम गजाआड : अंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये एका पंचवीस वर्षीय मतीमंद, मुकबधीर मुलीवर लैगीक अत्याचाराची घटना घडल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळताच, सपोनि मंगेश साळवे व त्यांच्या टिमने सदर गुन्ह्याची संवेदनशीलता व गांभीर्ण लक्षात घेऊन तात्काळ तपासची चक्रे फिरवून अवघ्या दोन तासात या गुन्ह्यातील चौघा आरोपींपैकी तिघांच्या मुसक्या आवळून गजाआड करण्याची किमया साधल्याने अंभोरा पोलिसांनी दाखवलेल्या कार्यतत्परतेचे नागरीकांतून स्वागत होत आहे.

वेतन अंदोलनाचा तिढा

आहे,पाणी पट्टी, घर पट्टी, गाळे व्यावसायिक भाडे व इतर मार्गाने येणारे उत्पन्नाचा ओघ नाही. सरंपच,गट विकास अधिकारी यांनी अंदोलन कर्त्यां समोर सर्व पर्याय खुले केले परंतु थकीत/चालू वेतनाच्या पन्नास टक्के पेक्षा कमी वेतन घेणार नाहीत या मुद्द्यावर कर्मचारी ठाम आहेत. अंदोलनाचे प्रतिनिधित्व करणारे विश्वंभर देशमुख (कारकून) म्हणाले कि, जो पर्यंत आम्हाला आमच्या मागण्या नुसार आमचे थकीत वेतन दिले जात नाही तो पर्यंत अंदोलन सुरु ठेवण्याचा निर्धार केला आहे .

उपलब्धतेनुसार वेतन दिले जाईल:बीडीओ नागरगोजे : गट विकास अधिकारी नागरगोजे यांनी अंदोलन कर्त्यां सोबत चर्चा केली . त्यांनी सांगितले कि ,चौदाव्या वित्त आयोगाच्या जमा रकमेवरील व्याज तसेच ग्रामपंचायत ला जे काही आणि जेवढा काही विविध मार्गातून मिळणा-या उत्पन्नातून मागचे थकीत वेतन टप्प्या टप्प्या नुसार दिले जाईल. सद्या चालू चार महिण्यांचे वेतन सरपंच देतील.असे पर्याय व्यक्त करत अंदोलन तिढा सोडवण्याचा प्रयत्न केला .

एक्झिट पोलमध्ये भाजपाला

आकडेवारीनुसार, अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला एकही जागा दाखवण्यात आलेली नाही. त्यामुळे आम आदमी पक्षाला धक्का बसण्याची शक्यता आहे.वरील सर्वच एक्झिट पोलनुसार काँग्रेसला हरियाणात बहुमत मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे, तर सत्ताधारी भाजपाची हॅटट्रिक चुकणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, एक्झिट पोलचे अंदाज अनेकदा चुकीचेही ठरू शकतात. ही फक्त अंदाजित आकडेवारी आहे. त्यामुळे निकालानंतर कोणत्या पक्षाची किती जागा मिळतील, स्पष्ट होईल. यामधील आकडेवारीमध्येही बदल होऊ शकतात. दरम्यान, असं असलं तरी हरियाणात काँग्रेस आणि भाजपामध्ये कोणते मुद्दे महत्वाचे ठरले यावर एक नजर टाकूयात.

तिरुपती लाडूच्या गुणवत्तेत

या वेळी ते बोलत होते. नायडू म्हणाले की, प्रसादाचे लाडू बनवताना वापरल्या जाणाऱ्या घटकांचा दर्जा तपासण्यासाठी प्रयोगशाळा स्थापन करण्याबरोबरच 'टीटीडी' गरज भासल्यास 'आयआयटी'चा सल्लाही घेऊ शकते. यापूर्वीच्या 'वायएसआर काँग्रेस'च्या राजवटीत प्रसादममध्ये भेसळयुक्त तूप वापरण्यात आल्याचा आरोप मुख्यमंत्री नायडू आणि 'टीटीडी'चे कार्यकारी अधिकारी यांनी केला होता.नायडू म्हणाले की, अनेक भाविकांनी लाडूच्या गुणवत्तेबद्दल समाधानी असल्याचे सांगून आनंद व्यक्त केला. लाडूच्या गुणवत्तेवर भाविकांनी असंतोष व्यक्त केल्याच्या अनेक घटना यापूर्वीच्या सरकारच्या काळात घडल्या. या मुद्द्याकडे तत्कालीन सरकारने दुर्लक्ष केले होते. परंतु आज आम्ही भाविकांकडून अभिप्राय घेत आहोत, असे नायडू यांनी सांगितले. अलीकडेच नायडू यांनी वेंकटेश्वर स्वामी मंदिराचे संरक्षक 'टीटीडी'च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह आढावा बैठक घेतली. प्रसाद बनवताना केवळ उत्तम दर्जाचे घटकच वापरले जातात का, याची खात्री करण्याच्या सूचना त्यांनी मंदिर अधिकाऱ्यांना दिल्या होत्या.

पान सहा वरून

ईच्छूक उमेदवारांनी दिल्या

राधाकृष्ण होके पाटील , प्रा.ईश्वर मुंडे,नारायण डक,सौ.ज्योतीताई डक,प्रा.श्रीहरी काळे,मनोहर डाके,गंगाभिषन थावरे,मंजूर शेख यांचेसह मोहन जगताप यांनी मुलाखती दिल्या आहे.माजलगाव मतदार संघात ईतर पक्षातील उमेदवार आपल्या समर्थकांचे मेळावे घेऊन आपली किती हजारी मनसबदारी आहे ते दाखवून देत आहेत.माजलगाव मतदार संघात महा विकास आघाडीला अच्छे दिन येतील असे वातावरण दिसत आहे. या मुळे पक्ष बाहेरील ईच्छूक शरद पवारांना कोण भेटले,जयंत पाटील यांना कोण भेटले याच्या दररोज वेग वेगळ्या वेगळ्या बातम्या येत आहेत.मग खा.शरदचंद्र पवार हे पक्षासमोर मुलाखती देणाऱ्या निष्ठावंतापैकीच कोणा एकाला तिकीट देणार की मागे फंद फितूरी करून दगाबाजी करणारांनाच पायघड्या घालणार असा प्रश्न माजलगाव मतदार संघातील जनतेला पडला आहे.

चाळीस वर्षे पंडित काय

कटचिंचोली रस्ता मंजूर करून आणला व आज त्याचे प्रत्यक्षात शिवराज पवार यांच्या हस्ते उद्घाटन होत आहे याचा ग्रामस्थांना आनंद आसल्याचे रामभाऊ येवले यांनी म्हटले आहे आज दि.५ ऑक्टोबर रोजी गेवराई तालुक्यातील दैठण ते कटचिचोली, रामा५० ते टाकळगव्हान, गोपत पिंपळगाव, काठोडा तांडा ते जातेगाव रस्ता कांमाचा शिवराज पवार यांच्या हास्ते शुभारंभ संपन्न यावेळी सरपंच रवि निवारे, सोपान कोकणे,डॉ. खोटे,इंद्रजीत महाराज येवले,माऊली खोटे,रामजी पवार, दिपक वावरे,समाधान मस्के,श्रिराम घाटुळ, रामभाऊ येवले,अभियंता नितीन वीर, डॉ.अभिजीत येवले,संभाजी चोरमले,रामदास पवार, हनुमान येवले,भरत गायकवाड, गोरख मोटे,आण्णा धुमक,रामकिसन येवले,रामाजी पवार, शिवाजी भाले,अनिल औटी,सुनिल पराड,संदिपान खोटे,बप्पासाहेब खोटे,अजय गोखले,तानांजी येवले,राहुल पराड,नर्सिंग खौटे,शिवाजी येवले आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

महायुती सरकारला

बैठक घेऊन निर्णय करावा लागेल, समाजाच्या हितासाठी लढणारे खरे प्रतिनिधी विधिमंडळात गेले पाहिजे यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. मराठवाड्यातील केज आणि मेहकर या दोन जागांचा त्यात समावेश आहे. बीड येथील रेल्वे स्टेशनला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे तसेच महाराष्ट्र सरकारने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ८ हजार रुपये भाव द्यावा अशी मागणी ही दीपक केदार यांनी यावेळी केली..या पत्रकार परिषदेला ऑल इंडिया पँथर सेनेचे प्रदेश कार्याध्यक्ष अशोक पाटील, प्रदेश सरचिटणीस जीवन गायकवाड, मराठवाडा प्रदेश युवक अध्यक्ष अजय भैय्या भुंबे, बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष मीनाताई लोंढे, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष बादल तरकसे, युवक जिल्हाध्यक्ष नितीन गोदाम, अमर वाघमारे, केज तालुकाध्यक्ष समाधान बचुटे, अंबाजोगाई महिला तालुकाध्यक्ष रेखाताई मस्के, गौतम आदमाने, अंबाजोगाई युवकाध्यक्ष शैलेंद्र बनसोडे, परळी युवक अध्यक्ष धम्मपाल भूतके, प्रसिद्धी प्रमुख प्रतीक वाघमारे, जिल्हा संघटक सुशील गायकवाड आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

दोन अवैद्य कत्तलखान्यांना

पाच-सहा महिन्यांपूर्वी प्रशासनाने पोलिस बंदोबस्तात येथील बारा बेकायदेशीर कत्तलखाने उध्वस्त केले होते. उर्वरित सहा कत्तलखाने तांत्रिक अडचणींमुळे तसेच होते. या कत्तलखान्यांसंदर्भातील फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १४५ प्रमाणे प्रस्तावावर पाटोदा येथील उपविभागीय दंडाधिकारी यांच्या न्यायालयाने दि. १३ रोजी मालमत्ता तातडीने ताब्यात घेत शासन निगरानीत घेण्याबाबतचा निर्णय दिला. या अनुषंगाने येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सचिन सानप यांनी ग्रामविस्तार अधिकारी अमोल करडुळे यांना आदेशित केल्यानंतर सहापैकी दोन कत्तलखाने सील करून ताब्यात घेतले.

रोजगार मिळवून देण्यासाठी

दर्जेदार आणि रोजगार मिळवून देणारे शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी आपण कायम आग्रही असतो, असेही डॉ.क्षीरसागर म्हणाले. यावेळी भाऊसाहेब डावकर यांचा सत्कार करून मान्यवरांनी नाळवंडी जिल्हा परिषद गटातील ४० शाळांना संगणक संच वितरित केले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केजमध्ये बौद्धांना नेहमीच

आणि आंबेडकरी समाजाने सुध्दा यांना कधी विचारलं नाही की आमचे किती प्रश्न तुम्ही विधानसभेत मांडले म्हणून.पण केज अंबाजोगाई मतदार संघात आंबेडकरी समाजाची निर्णायक मते असताना देखील या समाजाचा साधा आमदार होऊ शकत नाही हे विचार करण्यासारखं आहे.जवळ जवळ सर्व प्रस्थापित पक्षांनी आंबेडकरी समाजाचा फक्त वापर केला आहे.होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुका राज ठाकरे यांचा पक्ष मनसे हा राज्यातील जागा लढवणार असल्याने उमेदवाराची चाचपणी करण्यासाठी राज ठाकरे हे स्वतः राज्यातील दौरे करत आहेत.त्यामध्ये केज - अंबाजोगाई मतदार संघाची निवडणूक पूर्ण ताकदीने लढवण्याचेसंकेत दिले आहेत. त्यासाठी त्यांनी कार्यकर्त्यांकडून पक्ष कार्याचा अहवाल मागवला आहे.जेंव्हा राज ठाकरे यांनी शिवसेनेतून बाहेर पडत महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष स्थापन केला तेंव्हा पासून अंबाजोगाई येथील सुनिल जगताप हा कार्यकर्ता पक्षामध्ये आहे.कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता केवळ राज ठाकरे यांच्या प्रेमापोटी पक्षादेश प्रमाण मानून अंबाजोगाई तालुक्यातील गाव खेडे वाडी वस्तीवर राज ठाकरे यांचे विचार पोहचवण्याचे काम करत आहे.सुनिल जगताप यांनी अंबाजोगाई मध्ये मनसे जिवंत ठेवण्याचं काम केले आहे.किती तरी आले आणि आपला स्वार्थ साधून निघून पण गेले.सुनिल जगताप यांनी मनसेच्या माध्यमातून तळागाळातील लोकांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले आहे.लोकांचे प्रश्न शासन दरबारी मांडून लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.वेळ प्रसंगी जगताप यांनी अंगावर शेकडो केसेस अंगावर घेतल्या आहेत.आदिवासींना जमिनीचे वाटप करण्यात यावे, अंबाजोगाई शहरातील नागरिकांच्या प्रश्नांसाठी नगरपालिकेवर मोर्चा,अंबाजोगाई जिल्हा करण्यात यावा या मागणीसाठी तत्कालीन मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांना काळे झेंडे दाखवले, रस्त्यासाठीआंदोलन, भोगवटधारकांचा प्रश्न असेल राशन दुकानाचा प्रश्न तलाठ्यांच्या मनमानी विरोधात, जयवंती नदीचे आंदोलन,असे विविध आंदोलने करून अधिकाऱ्यांना घाम फोडला.पक्ष वाढीसाठी सदस्य नोंदणी जगताप यांनी सामान्य लोकांची कामे करून जनसामान्यात आपल्या कामाची वेगळीच छाप पाडली आहे.अशा या आंबेडकरी समाजाच्या कार्यकर्त्यास राज ठाकरे यांनी विधानसभेची उमेदवारी दिल्यास आंबेडकरी समाज हा सुनिल जगताप यांना ओटीत घेऊन प्रस्थापित पक्षाला हाबाडा दिल्या शिवाय राहणार नाही.

ओबीसी गावामध्ये मत मागायला

प्रतिनिधित्व करत असताना आ.नमिता मुंदडा तुम्ही एका समाजा पाठींबा देता व एका समाजावर अन्याय करायचा केज मतदार संघात एवढा ओबीसी समाज आहे कि फक्त ओबीसी समाजाच्या मता वर आमदार सुध्दा निवडुन येऊ शकतो तरी पण आमदार म्हणून जर तुम्ही ओबीसी आरक्षणावरची भुमिका स्पष्ट करीत नसाल तर येणाऱ्या विधानसभेला ओबीसी समाजाने तुम्हाला मतदात का करावे आरक्षणाचा मुद्दा पेटलेला असताना एकदा तरी सभागृहात नमिता मुंदडा यांनी ओबीसी आरक्षणा विषयाची प्रश्न मांडला नाही तर मग येणाऱ्या विधानसभेला ओबीसी बांधवांनी जाती साठी मतदान करु नये व आमदारा नमिता मुंदडा यांनी सुध्दा येणाऱ्या विधानसभेत ओबीसी समाज बांधवांच्या दाराला मते मागण्यासाठी येऊ नये असे मत दैनिक पुण्यभूमी शी बोलताना युवा नेते प्रदिप (भैय्या)घुले यांनी व्यक्त केले आहे.

वाचनालयात विद्यार्थ्यांना

उपलब्ध करून दिले जात नाहीत तर गावातील जे शालेय विद्यार्थी आहेत या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर विविध कार्यक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांचा वेळोवेळी गुणगौरव केला जातो. त्यांना बक्षीस दिले जातात आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वातावरण टिकवून राहावं यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले जातात. या ठिकाणी विद्यार्थ्यांचे वाढदिवस साजरे करून त्यांना आनंदमयी जीवण जगण्याचं प्रोत्साहन दिलं जातं. या वाचनालयाच्या कर्तव्यदक्ष ग्रंथपाल सौ. शिलाताई सुखदेव उजगरे यांच्या अथक परिश्रमातून या वाचनालयाची प्रगती अत्यंत मोठ्या प्रमाणात झालेली आहे. या वाचनाच्या माध्यमातून गावातील शेकडो विद्यार्थ्यांना विविध उपक्रमातून प्रोत्साहित केले जाते त्यामुळे या ठिकाणचे शैक्षणिक वातावरण अत्यंत प्रगल्भ झाला आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर निर्माण झालेले हास्य बघून निश्चितच सर्वांना प्रेरणा मिळेल. अशा संस्कार केंद्राची नितांत गरज आहे अशा संस्कारामुळे संस्कार केंद्र चालकांना, विद्यार्थ्यांना, विद्यार्थ्यांच्या पालकांना सर्वस्वी आनंद प्राप्त होतो. ही सेवा सतत आणि निस्वार्थीपणे या संस्कार केंद्रात केली जाते. या संसार केंद्राचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घेणे गरजेचे आहे अशी भावना पालकांमधून व्यक्त होत आहे.

बप्पासाहेब घुगेवर कारवाइ

अगोदर बाहेर,कमनीच्या आता थांबतात, या हॉटेलला पार्किंग नसल्याने वाहने रस्त्यावरच लावतात त्यामुळे या भागातील नागरिकांना त्रास होत असल्याने स्थानिक रहिवाशी बीड पोलीस अधीक्षक व पालकमंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेऊन या भागातील बंद करण्यात यावा अशी मागणी करणार आहेत.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

योजनेच्या प्रस्तावांना मिळाली मंजुरी!

तत्पर वैशाली पाटीलांकडून पहिल्याच बैठकीत प्रश्न मार्गी

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

मागील वर्षभरापासून प्रतीक्षेत असलेल्या तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजनेचे तेवीसशे पैकी ७०० प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. नव्याने नियुक्ती झालेले तहसीलदार वैशाली पाटील यांनी पहिल्या बैठकीत हा प्रश्न मार्गी लावल्याने योजनेच्या लाभार्थीमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

आष्टी तालुक्यात संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेचे वर्षभरापासून २ हजार ३०० प्रस्ताव प्रलंबित होते. तहसीलदार वैशाली पाटील यांनी पहिल्याच बैठकीत सर्व प्रस्तावांची फेरतपासणी करून तातडीने ७०० प्रस्तावांना मंजुरी दिली. यामुळे गोरगरीबांचा अर्थसाह्याचा प्रश्न मार्गी लागला असून, लाभार्थीमधून समाधान व्यक्त होत आहे.

आष्टीत अशासकीय समिती अस्तित्वात नसल्याने योजनेचे लाभार्थी चकरा मारत होते. परंतु प्रस्ताव रखडले होते. या पार्श्वभूमीवर तहसीलदार पाटील यांनी आठ दिवस या फाईलची तपासणी करून २ हजार ३०० पैकी ७०० प्रस्ताव मंजूर केले.

आचारसंहितेपूर्वी होणार दुसरी बैठक!

तालुक्यातें संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने आहेत. वर्षभरात सुमारे २३०० प्रस्ताव नव्याने दाखल झाले होते. नागरिकांनी तहसील प्रशासन, सेतू सुविधा केंद्र, तलाठी यांच्याशी संपर्क साधून आपल्या कागदपत्रांची पूर्तता करावी. कोणत्याही दलालाकडे फाईल देऊ नये. आचारसंहिता लागण्यापूर्वी लवकरच दुसरी बैठक घेऊन यामध्ये नव्याने दाखल होणारे प्रस्ताव मंजूर होणार असल्याचे तहसीलदार पाटील यांनी सांगितले. संबंधितांनी आपापले प्रस्ताव पूर्ण कागदपत्रांसह दाखल करावेत, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी

सभापती तांबोळी:शेतकऱ्यांना करण्यात आले आवाहन

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

हंगाम २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेडकडून सोयाबीन, मूग, उडीद उत्पादकांनी कडा कृषी उत्पन्न बाजार समितींतर्गत शासकीय खरेदी केंद्रावर आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन नोंदणी सुरू झाली असून शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी. असे आवाहन बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.

कडा कृषी उत्पन्न बाजार समितीत माजी मंत्री सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने जामगाव सेवा सोसायटीस शासकीय हमीभाव खरेदी केंद्र म्हणन मंजुरी मिळाली. त्यामुळे आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांनी सातबारा, आधारकार्ड, बँक पासबुक, ऑनलाइन पीकपेरा प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रासह प्रत्यक्ष येऊन नोंदणी करावी. सध्या खाजगी व्यापारी हमी भावापेक्षा कमी दराने माल खरेदी करत असून शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन ४८९२, मुग ८६८२, तर उडीद ७४०० रुपये प्रतिक्विंटल असा भाव मिळणार आहे. शेतकऱ्यांनी या संधीचा

लाभ घेण्याचे आवाहन सभापती तांबोळी यांनी केले आहे. मुग व उडीद खरेदीचा कालावधी ७ जानेवारी २०२५ तर सोयाबीन खरेदीचा कालावधी १२ जानेवारी २०२५ पर्यंत असल्याचे सांगण्यात आले आहे.

तेली समाजाकडून आनंदोत्सव साजरा

निर्णय: संताजी जगनाडे महाराज महामंडळ स्थापन

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने तेली समाजासाठी श्री संताजी जगनाडे महाराज आर्थिक विकास महामंडळ नुकतेच स्थापन करण्यात आले. यानिमित्ताने येथील तेली समाजाच्या वतीने शहरातील राणी लक्ष्मीबाई टाँवर चौकात फटाके फोडून पेढे भरवून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

संपूर्ण महाराष्ट्रातील तेली समाजाच्या वतीने गेल्या २५ वर्षांपासून समाजाच्या आर्थिक विकासासाठी महामंडळ स्थापन करावे अशी मागणी सातत्याने करण्यात येत होती. सध्या विधानसभेच्या निवडणूका तोंडावर आल्याने ही मागणी जोर धरू लागली. दोन दिवसांपूर्वी नागपूर येथे महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे अध्यक्ष माजी खासदार रामदासजी तडस, उपाध्यक्ष तथा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात

आले होते. यावेळी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने ही मागणी करण्यात आली यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासित केले होते की, लवकरच ही मागणी पूर्ण करु त्याप्रमाणे अवघ्या चौवीस तासात हे महामंडळ स्थापन्याची घोषणा मंत्रीमंडळ बैठकीत करण्यात आली. याबद्दल महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे महासचिव भूषण कर्डिले सर, गजानन नाना शेलार व सर्व पदाधिकारी यांचे आभार व्यक्त करण्यासाठी व आनंदोत्सव परळीतील राणी लक्ष्मीबाई टाँवर चौकात तेली समाजातील युवक व नागरीकांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून फटाक्यांची आतिषबाजी करत पेढे वाटून आनंद साजरा करत महाराष्ट्र शासनाचे आभार व्यक्त करण्यात आले.

अरोही स्टाईल स्टुडीओचा दांडीया महोत्सव

परंपरा:महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या हस्ते उदघाटन

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी शहरातील अरोही स्टाईल स्टुडीओच्या संचालिका,सामाजीक कार्यकर्त्या सौ.श्रध्दा गजानन हालगे- फुलारी यांच्या वतिने आयोजीत बेलवाडी येथे दांडीया स्पर्धे स प्रारंभ झाला या दांडीयाचे महिला पोलिस कर्मचार्यांच्या हस्ते व विविध क्षेत्रातील महिलांच्या उपस्थितीत शुक्रवार दि.४ ऑक्टोबर रोजी शुभारंभ करण्यात आला.या दांडीयामध्ये महिलांसाठी खेळ पैठणीचा,फॅशन शो,आरती ताट सजावट व दांडीया स्पर्धेतून दररोज आकर्षक बक्षीसे देण्यात येत आहेत.

परळी शहरातील महिलांना आपल्याच भागात दांडीया खेळाचा आनंद घेता यावा यासाठी अरोही स्टाईल स्टुडीओच्या वतिने नवरात्रोत्सवात प्रभु वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या गुरुलिंगस्वामी मठ,बेलवाडी येथे दररोज सायंकाळी ७ ते १० या वेळेत नारीशक्ती दांडीया महोत्सवाचे आयोजन केले आहे.यामध्ये फॅशन शो,खेळ पैठणीचा,आरती ताट सजावट व दांडीया स्पर्धा

घेण्यात येत आहेत.तसेच दररोज वेगवेगळ्या स्पर्धा घेवुन यातील विजेत्या महिलांना पेंटेवार कलेक्शनच्या वतिने दररोज आकर्षक साडी व प्रथम विजेत्या महिलेसाठी पैठणी साडी,अर्जुन लक्ष्मण नावंदे यांच्या सिध्देश्वर ज्वेलर्सच्या वतिने सोन्याची नथ,राजलक्ष्मी १ग्रॅम ज्वेलरी,सानिया फॅशन व स्पार्कल मेकअप स्टुडीओच्या वतिने आकर्षक बक्षीसे देण्यात येणार आहेत.या दांडीया स्पर्धेत सहभाग नोंदवणार्या महिलांना पेंटेवार कलेक्शनच्या खरेदीवर वतिने पाच टक्के सूट देण्यात येणार आहे.या नारीशक्ती दांडीया महोत्सवाचे शुक्रवार दि.४ ऑक्टोबर रोजी पोलिस विभागातील महिलांच्या हस्ते व डॉक्टर,वकिल,सामाजीक कार्यकर्त्या,जेष्ठ गृहिणींच्या उपसथितीत शुभारंभ करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुण्या महीलांचे नारीशक्ती दांडीया महोत्सवाच्या आयोजिका तथा अरोही स्टाईल स्टुडीओच्या संचालिका सौ.श्रध्दाताई गजानन हालगे (फुलारी) यांनी स्वागत केले.

...अन्यथा उपोषण करण्याचा इशारा

सवाल:रेशन दुकानदाराचा मनमानी कारभार

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

एमआयएम पक्षाचे पैठण शहराध्यक्ष निसार बागवान यांनी पैठण शहरातील स्वस्त धान्य दुकान क्रमांक ०१च्या दुकानावर चौकशी करून कारवाई करावी या मागणीसाठी पैठण तहसील कार्यालय वारंवार निवेदन देऊन कारवाई होत नसल्याने आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की शहरातील स्वस्त धान्य दुकान क्रमांक ०१ चे दुकानदार हे पिवळे राशन कार्डधारक ग्राहकांना त्यांच्या हक्काचे ३५ किलो राशन न देता त्याऐवजी फक्त २० किलो राशन देत आहे.अशाप्रकारे १५ किलो राशनचा ते काळाबाजार करत असून याबाबत मी गेल्या दोन महिन्यापासून तहसील कार्यालय व संबंधित विभागाशी कागदपत्रे पुरव्यांसहित चौकशी करून कारवाई करण्याची मागणी करत आहे.

खालीद जावेद आम्बेकर या ग्राहकाचे परस्पर नाव वगळून संबंधित दुकानदाराने व पुरवठा अधिकारी यांनी एका राज्य सरकारच्या कर्मचाऱ्याला पिवळे रेशन कार्ड देऊ केले असून याची चौकशी करून

योग्य ती कारवाई देखील करण्यात आलेली नाही. दि.७ ऑक्टोबर २०२४ च्या आत या प्रकरणाचा तोडगा निघाला नाही तर मी एमआयएम पक्षाचा शहराध्यक्ष या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ संबंधित दुकानदार व संबंधित तहसील कार्यालय अधिकारी व कर्मचारी यांच्या विरोधात म्हणून आमरण उपोषण करणार आहे.

केजमध्ये बिर्याणी हाऊसवर कार्यवाही!

दणका:३८ बिर्याणी हाऊसवर पोलिसांचा छापा !

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

मागच्या अनेक वर्षांपासून बिर्याणी हाऊसमध्ये सुरु असलेल्या अवैध दारु विक्रीकडे अखेर पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी लक्ष केंद्रित करुन जिल्हयातील ३८ बिर्याणी चालकांवर गुन्हा दाखल केले आहेत. बीडच्या इतिहासात एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर कारवाई होण्याची कदाचित ही पहिली वेळ असेल. ६ /१०० अविनाश बारगळ यांनी पदभार घेतल्यापासून कारवाईचा दणका सुरुच ठेवला आहे. कधी वाळू तस्करी, कधी गुटख्या माफिया, कधी दारुवाले, तर कधी वाहनांचे उल्लंघन करणाऱ्यांना कायद्याची जरब बसावी म्हणून बारगळ सातत्याने कारवाया करत आहेत. शुक्रवारी दिवसभर बिर्याणी सेंटरमध्ये सुरु असलेल्या अवैध दारु विक्रीवर लक्ष केंद्रित करुन जिल्ह्यातील ३८ ठिकाणी छापे मारण्यात आले. यात ३८ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. दरम्यान पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके, सहा. पोलीस अधिक्षक धीरजकुमार बच्चू, सहा. पोलीस अधिक्षक कमलेश मीना, उपविभागीय अधिकारी विश्वंभर गोल्डे, उपविभागीय अधिकारी नीरज राजगुरु, उपविभागीय अधिकारी अनिल चोरमले यांच्या मार्गदशनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, शिवाजी बंटेवाड, मारुती खेडकर, एस. एम. जाधव, मजहर सय्यद, बालक कोळी, प्रशांत महाजन, विनोद घोळवे, रामराव पडवळ, संभाजी ढोणे, सपोनि मधुसूदन घुगे, सोमनाथ नरके, मंगेश साळवे, भार्गव सपकाळ, अमन सिरसाट, अनिल खोडेवाड, भाऊसाहेब वाघमोडे, मछिंद्र शेंडगे, अनमोल केदार, राजकुमार ससाणे यांच्या वतीने करण्यात आली.

विहितेची गळफास घेऊन आत्महत्या

खळबळ:वरठाण येथील दुःखद घटना

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

पतीच्या सतत व वारंवार शारीरिक व मानसिक त्रास देऊन आर्थिक छलास कंटाळून तालुक्यातील वर ठाण येथील विवाहितेचा गळफास घेऊन आत्महत्या प्रकरणी शुक्रवारी रात्री बारा वाजता पतीस अटक करून शनिवारी सोयगाव च्या न्यायालयाने त्यास हर्सूलला रवानगी केली आहे या घटनेमुळे वरठाण परिसरात शोककळा व्यक्त करण्यात येत आहे

पूजा सोपान संसारे(वय२७) असे गळफास घेवून मृत झालेल्या विवाहितेचा नाव आहे गुरुवारी रात्री विवाहितेने पतीने वेळोवेळी घरघुती कारणावरून शिवीगाळ व मारहाण करुन शारिरीक व नानसिक छळ करुन त्यांचे छळास कंटाळून गुरुवारी रात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास , वरठाण येथे राहते घरी लोखंडी फॅनला नायलॉनच्या दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केली आहे. याप्रकरणी पति सोपान पितांबर संसारे व अन्य एक अशा दोघांनी आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने

अकरा महिन्याच्या बाळाच्या आईने गळफास घेतला

दरम्यान अकरा महिन्यांची बाळाच्या आईने गळफास घेतल्या ने वरठाण सह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे .

पती सोपान संसारे(वय ३३) यास शुक्रवारी रात्री बारा वाजता अटक केली दरम्यान मृत पूजा वर शुक्रवारी दुपारी बनोटी येथील आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करून सायंकाळी सहा वाजता पोलीस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले होते मृत पूजा च्या पश्चत पती दोन मुली दोन मुले असा परिवार आहे याप्रकरणी पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक रजाक शेख,संदीप सुसर,राजेंद्र बर्डे, दिलीप पवार गजानन दांडगे आदी तपास करत आहे.

योजना २६ हजार ७३५ महिलांना मिळणार दिवाळी बोनस

बहिणींच्या खात्यावर दिवाळी बोनस जमा!

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत रविवारी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या लाडकी बहीण योजनेचा महामेळाव्या च्या पूर्वसंध्येला सोयगाव तालुक्यातील ३ हजार ५८९ महिलांच्या खात्यात दिवाळी बोनस म्हणून सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्याचे रक्कम तीन हजार रु याप्रमाणे शनिवारी दुपारी तीन वाजेपासून खात्यात वर्ग होण्यास सुरुवात झाली आहे दरम्यान योजनेचा अर्ज भरण्याची कालावधीत ५१६ महिलांचे अर्ज अपात्र झाल्याने त्यांना लाडकी बहीण योजनेतून बाद करण्यात आले आहे

लाडकी बहीण योजनेचा पहिल्या टप्प्यात तालुक्यातील १६ हजार ८६४ अर्जा पैकी १६ हजार ७८९ अर्ज मंजूर झाले होते यामध्ये ७३ अर्ज नामंजूर झाली होती तर दुसऱ्या टप्प्यात १० हजार ७४४ पैकी १० हजार २८१ अर्ज मंजूर झाली असून ४४३ अर्ज नामंजूर झाली आहे त्यामुळे दोन्ही टप्प्यात २६ हजार

दिवशी विक्रमी महिलांच्या खात्यात रक्कम जमा

दरम्यान दिवाळी बोनस पोटी शनिवारी दुपारी तीन वाजेपासून ते सायंकाळी सहा पाच वाजेपर्यंत तीन हजार महिलांच्या खात्यात दिवाळी बोनस ची रक्कम जमा झाली आहे त्यामुळे लाडक्या बहिणींना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत रविवारी छत्रपती संभाजीनगर येथील लाडकी बहिण मेळाव्याच्या पूर्वसंध्येला हा लाभ दिला आहे योजनेचा दोन्ही टप्प्यातील त्रुटीतील अर्जाची अंगणवाडी सेविका आणि मदतनीस छाननी करून दिवाळी पूर्वी त्रुटीत असलेल्या महिलांना पुन्हा संधी देऊन पात्र करण्यात येणार असल्याचे प्रकल्प अधिकारी दीपक म्हेत्रे यांनी सांगितले आहे.

७३५ महिला लाडकी बहीण योजना साठी पात्र ठरली आहे दरम्यान दिवाळी बोनस म्हणून शासनाने सप्टेंबर व ऑक्टोबर या दोन महिन्याचे आगाऊ मानधन खात्यावर वर्ग करण्याची घोषणा केली असतांना शनिवारी या दिवाळी बोनस ची रक्कम तीन हजार ५८९ महिलांच्या खात्यात वर्ग झाली असून दहा ऑक्टोबर पर्यंत या सर्वच पात्र महिलांना टप्प्या टप्प्यात हा लाभ मिळणार असल्याचे प्रकल्प अधिकारी दिपक मेहेत्रे यांनी सांगितले आहे

संविधान सन्मान रॅली उत्स्फूर्त

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील मातंग समाज व मातंग समाजातील तत्सम जातींना शैक्षणिक सामाजिक आर्थिक व राजकीय न्याय मिळावा यासाठी माननीय सर्वोच्च न्यायालयाने एक ऑगस्ट २०२४ रोजी अनुसूचित जाती जमातीतील अ ब क ड आरक्षण वर्गीकरणाचा निर्णय दिला होता त्या निर्णयाच्या सन्मानार्थ गेवराई तालुक्यातील सकल मातंग समाजाच्या वतीने आण्णा भाऊ साठे चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, शास्त्री चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सांवता माळी चौक, मार्ग तहसील कार्यालय येथे संविधान सन्मान रॅली काढुन मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा सन्मान व स्वागत करण्यासाठी गेवराई तहसील कार्यालयावर सकल मातंग समाजाच्या वतीने संविधान सन्मान रॅली काढण्यात आली या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अनुसूचित जाती जमातीच्या आरक्षण वर्गीकरणाच्या आदेशाची अंमलबजावणी राज्य शासनाने तात्काळ करावी या साठी या रॅली मध्ये हजारो मातंग बंधु भगिनी सहभाग घेतला होता.

सुविचार- ज्ञानाने बुद्धी जिंकता येते पण सेवेने अंतकरण जिंकता येते.

अस्वस्थ शांतता.....!

आतापर्यंत इस्रायलवर थेट हल्ला करण्याचे धाडस इराणने दाखविले नव्हते. इराणच्या वतीने त्यांनी पोसलेल्या हमास, हिजबुल सारख्या संघटना इस्रायलच्या विरोधात लढत होत्या; परंतु यावेळी इस्रायलने हिजबुलप्रमुखाची हत्या केल्यानंतर इराणचा संयम सुटला आणि इराणने तब्बल दोनशे क्षेपणास्त्रे इस्रायलवर डागली. त्यामुळे मध्य-पूर्वेतील संघर्ष निर्णायक आणि घातक वळणावर पोहचला आहे. हे वळण जगाला कोणत्या दिशेने घेऊन जाईल हे सांगणे कठीण आहे. खरेतर इतर अनेक पर्याय उपलब्ध असतानाही इराणने इस्रायलवर थेट हल्ला करण्याचे घातक पाऊल उचलल्याने जागतिक विश्लेषकदेखील चकित झाले आहेत. आतापर्यंत इराणचे धोरण इस्रायलच्या कोणत्याही लष्करी कारवाईला न भडकवता किंवा तशी संधी न देता कारवाई करण्याचे होते. मात्र, आता इराणने इस्रायलला प्रत्युत्तर देण्याचे निमित्त दिले आहे. इराणच्या हल्ल्यानंतर अजून तरी इस्रायलने प्रत्युत्तरात कोणतीही कारवाई केलेली नाही; परंतु ही अत्यंत अस्वस्थ शांतता आहे. इस्रायल प्रत्युत्तर देणार हे निश्चित. हे प्रत्युत्तर इराणच्या हल्ल्यापेक्षा निश्चितच अधिक जबर असेल. इराणचे आण्विक केंद्र, लष्करी तळ किंवा इराणच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या तेल स्रोतांवर हा हल्ला होऊ शकतो. हे हल्ले करण्यास इस्रायल सक्षम असल्याची इराणला कल्पना आहे. शिवाय इस्रायलच्या या कारवाईला अमेरिकेचेही पूर्ण समर्थन असेल. वेळ पडल्यास अमेरिका स्वतः या युद्धात उतरण्याची शक्यता नाकारता येत नाही. मागच्या ७ ऑक्टोबरच्या हल्ल्यानंतर सुरुवातीला इस्रायलने हमासच्या ताब्यात असलेल्या ओलिसांना सोडविण्यासाठी कारवाई सुरू केली. एका अर्थाने ती मर्यादित कारवाई होती; परंतु नंतर हमासचा पूर्णपणे बिमोड करण्यापर्यंत या कारवाईचा परिघ इस्रायलने विस्तारत नेला. या कारवाईत आतापर्यंत जवळपास दहा ते वीस हजार हमास सैनिक मारले गेले आहेत. त्यांच्या अनेक नेत्यांची, कमांडरांची हत्या करण्यात आली आहे आणि अनेक नेते, कमांडर गाझामधील बोगद्यांच्या चक्रव्युहात अनिश्चित काळासाठी अडकून पडले आहेत. हमासचा अशाप्रकारे शक्तिपात केल्यानंतर इजरायलने उत्तरेकडील सीमा व हिजबुल्लाहवर लक्ष केंद्रीत केले. इस्रायलने हिजबुल्लाहच्या विरोधातही अतिशय प्रभावी हल्ले केले. सुरुवातीला पेजर व वॉकी-टॉकीत स्फोट घडवून आणल्यानंतर लेबनॉनमधील हिजबुलच्या मुख्य ठिकाणांवर इस्रायलने बॉम्ब हल्ले केले. त्या हल्ल्यात तीन दशकांपासून या गटाचे नेतृत्व करणाऱ्या हसन नसराल्लासह हिजबुल्लाहच्या हायकमांडला संपवले. त्यानंतर इराणने अचानक आक्रमक पवित्रा घेऊन इस्रायलवर क्षेपणास्त्रांनी हल्ला चढवला. हिजबुल आणि हमास या दोन्ही संघटना इस्रायलच्या पाठिंब्यावर उभ्या असल्या तरी त्यांच्यात एक मूलभूत अंतर आहे. हिजबुल्लाहप्रमाणेच हमासलाही इस्रायलचा नाश करायचा आहे; परंतु हमासला पॅलेस्टिनींचे समर्थन आहे व ती राष्ट्रीय मुक्ती चळवळ आहे. याउलट हिजबुल्लाह हे पूर्णपणे इराणी परराष्ट्र धोरणाचे एक साधन आहे, त्याचा लेबनीज किंवा पॅलेस्टिनी लोकांच्या आकांक्षांशी काहीही संबंध नाही. या पृष्ठभूमीवर इस्रायलची हमास आणि हिजबुल विरुद्धच्या कारवायांमागील मानसिकता आणि निर्धार बघता इस्रायलचा इराणवरील संभाव्य हल्ला केवळ इराणच्या हल्ल्याला प्रतिउत्तर देणाराच असेल असे म्हणता येत नाही. कदाचित ही समस्या मुळापासून उखडून टाकण्याचा निर्धार इस्रायल करीत असावा. या संभाव्य कारवाईसाठी नेतान्याहू सरकारला भक्कम देशांतर्गत पाठिंबा आहे आणि अमेरिकेचीही साथ आहे. इराणची सध्याची राजवट उलथून टाकण्याचा प्रयत्नदेखील इस्रायल करू शकतो. कदाचित अमेरिकेलादेखील तेच हवे आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी इराण स्वतंत्र होईल आणि तो क्षण लोकांच्या अपेक्षेपेक्षा खूप लवकर येईल तेव्हा सर्व काही वेगळे असेल, असे विधान नुकतेच केले आहे. हे सगळे पाहता सध्या इस्रायलकडून जो संयम दाखविला जात आहे किंवा प्रत्युत्तराच्या कारवाईसाठी जो विलंब केला जात आहे तो एका मोठ्या आणि अतिशय विध्वंसक कारवाईचा संकेत म्हणता येऊ शकतो. इस्रायलच्या अपेक्षित हल्ल्याला तोंड देण्यासाठी इराणदेखील पूर्णपणे तयार आहे. इराणने आपली सगळी क्षेपणास्त्रे आणि अन्य घातक अस्त्रे बंकरमध्ये सुरक्षितपणे लपविली आहेत. तेल केंद्रावरील सुरक्षा अधिक कडेकोट केली आहे, शिवाय इराण जागतिक तेल व्यापाराचीसुद्धा नाकेबंदी करू शकतो. त्यामुळे उद्या हे युद्ध भडकलेच तर ते केवळ या दोन देशांपुरते मर्यादित राहणार नाही, तर त्याचा परिणाम संपूर्ण जगावर आणि खास करून जगाच्या अर्थव्यवस्थेवर होणार हे निश्चित.

समृद्धीला राज्यमान्यता .....!

सुमारे अडीच हजार वर्षांचा इतिहास असलेल्या सोबतच प्राचीन आणि समृद्ध वारसा असलेल्या मराठीला अखेर दिल्ली दरबारने अभिजात भाषेचा दर्जा प्रदान केला. कदाचित महाराष्ट्रात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांची पृष्ठभूमी या निर्णयामागे असेल; परंतु शेवटी हा निर्णय स्वागतार्ह म्हणावा लागेल. भारतातील प्राचीन भाषेला अभिजात दर्जा देण्याची संकल्पना केंद्र सरकारने २००४ पासून अंमलात आणली आणि सर्वप्रथम तामीळ भाषेला हा दर्जा देण्यात आला. त्यानंतर संस्कृत, कन्नड, तेलगू, मल्याळम, ओडिया या भाषांना अभिजात दर्जा प्रदान करण्यात आला. अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी ती भाषा किमान दीड ते दोन हजार वर्षे प्राचीन असावी, त्या भाषेत समृद्ध ग्रंथ व अन्य साहित्य परंपरा असावी, ते मूळ त्याच भाषेत लिहिलेले असावे, अनुवादित नसावे, भाषेचा प्रवास अखंडित असावा आणि प्राचीन व सध्याच्या भाषेतील नाते सुस्पष्ट असावे, अशा सर्वसाधारण अटी आहेत. या अटींची पूर्तता करणाऱ्या भाषेला अभिजात दर्जा मिळतो. मराठीला हा दर्जा प्राप्त व्हावा म्हणून राज्य सरकारने २०१२ रोजी प्रा. रंगनाथ पाठारे यांच्या अध्यक्षतेखाली अभिजात भाषा समिती नेमली. प्रा. हरी नरके, डॉ. नागनाथ कोतापल्ले आदींचा त्यात समावेश होता. या समितीने आपला अंतिम अहवाल तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे सादर केला. पुढे तो केंद्राकडे पाठविण्यात आला. त्याचा अभ्यास करून मराठी भाषा प्राचीन असून अभिजात दर्जा देण्यासाठी सुयोग्य असल्याचा निर्वाळा साहित्य अकादमीने दिला, पण केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी हा प्रस्ताव अनेक वर्षे प्रलंबित राहिला. दरम्यानच्या काळात हा दर्जा देण्यासाठीच्या निकषांमध्ये बदल करून ते कठोर करण्याचा विचार सुरू झाला. त्यामुळे हा विषय रेंगाळत राहिला. अभिजात दर्जा असलेल्या भाषा अधिक समृद्ध होण्यासाठी केंद्र सरकारकडून मोठे अनुदान मिळते, भाषा भवन, ग्रंथ व साहित्य प्रसार, ग्रंथालये, देशभरातील विद्यापीठे, केंद्रीय विद्यापीठे किंवा अन्य संस्थांमार्फत भाषा प्रसार, अध्यासने, त्या भाषेतील विद्वानांसाठी पुरस्कार आदींसाठी आर्थिक पाठबळ मिळते; परंतु सर्वाधिक महत्त्वाची बाब म्हणजे अभिजात दर्जा मिळाल्याने भाषेच्या समृद्धीवर राजमान्यतेची मोहोर उठते. ही मोहोर आता उलटली आहे. विलंबाने का होईना मराठीच्या समृद्धीला राज्यमान्यता लाभली आहे, हेही नसे थोडके.

चौफेर

आनंद आंबेकर
9850388613
कार्यकारी संपादक, देशोन्नती

ब्रँड देवा भाऊ आणि जाहिरातींची गरज; हेच सरकारचे अपयश!

पदाधिकारी, कार्यकर्ते काय नेता जे करतो तेच योग्य या मताचे असतात, पण जरा जनतेमध्ये सुरू असलेल्या कुजबुजीचा कानोसा घ्या. नाहीतर हाच 'देवा-भाऊ ब्रँड सत्तेपासून दूर नेईल. देवेंद्र फडणवीस हाच एक ब्रँड आहे. सरकारच्या योजना लोकांच्या हिताच्या असेल तर त्याचा फायदा निवडणुकीत सत्ता पक्षाला होईलच. या योजनांची जनजागृती करण्यासाठी सरकारी यंत्रणा आहे. जनजागृती झालीच पाहिजे, पण सध्या त्याची जी ब्रॅण्डिंग सुरू आहे, त्याचा हेतू वाईट आहे, इतकेच.'

पितृपक्ष संपला. वर्तमानपत्राचे पाने जाहिरातींनी भरू लागले. या जाहिराती कॉर्पोरेटच्या कमी आणि सरकारी अधिक आहे. आचारसंहिता लागू होईपर्यंत हे असेच चालणार आहे. जनतेचा पैसा योजनांच्या ब्रॅण्डिंगवर उडवला जाणार आहे. त्यात महायुतीचे शिल्पकार, भाजपचे महाराष्ट्रातील कर्ताधर्ता देवेंद्र फडणवीस यांचे नव्याने नामकरण झाले. देवेंद्रचे देवा भाऊ झाले. फडणवीस यांच्या निवडणूक रणनीतीकाराची ही रणनीती असावी, पण 'देवा भाऊ' हे बदललेले नाव आणि निवडणूक डोळ्यासमोर ठेवून जाहीर केलेल्या योजना आणि त्याची जनतेच्या पैशातून सुरू असलेली ब्रॅण्डिंग खरंच महायुतीला विजय मिळवून देईल का?

लोकसभेतील अपयश जिव्हारी लागलेल्या भाजपने महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक अत्यंत गांभीर्याने घेतली आहे. लोकसभेच्या निकालानंतर लागलीच विधानसभेची तयारी सुरू झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचे महाराष्ट्रातील दौरे वाढले. राज्य शासन म्हणून महायुती सरकारने मागील तीन महिन्यांत योजनांचा पाऊस पाडला. त्या तात्काळ अमलातही आणल्या. विशेष म्हणजे या योजनांच्या ब्रॅण्डिंगसाठी सरकारी तिजोरीतील करोडो रुपये खर्च केले. राज्यभरात झालेल्या नारी शक्ती मेळाव्यांनी उपस्थितीचे अर्थात गर्दीचे उच्चांक गाठले. या मेळाव्यात मुख्यमंत्र्यांनी रॅम्प वॉक केला. ताई, पैसे जमा झाले का, अशी आस्थेने विचारणा वगैरे केली म्हणे. या मेळाव्यानंतर आता माध्यमांना तीन तीन, चार चार पूर्ण पाने, इलेक्ट्रॉनिक मीडियांना दिवसभर चालणाऱ्या जाहिराती देण्यात येत आहे. सर्वत्र सरकारचे कौतुक सुरू आहे.

राज्य सरकारच्या जोडीला केंद्र सरकारची महाराष्ट्रावर धनवर्षा सुरू आहे. घोषणांची खैरात वाटली जात आहे. या घोषणांमध्ये मराठी भाषेला देण्यात आलेला अभिजात दर्जा ही घोषणा प्रत्येक मराठी मनासाठी अभिमानाची आहे. यासाठी केंद्र सरकारचे खरंच कौतुक आहे. मात्र, महाराष्ट्रातील निवडणूक नसती तर ही घोषणा झाली असती का? केंद्रात १० वर्षांपासून भाजपचे सरकार आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची मागणीही जुनीच आहे. मग ही घोषणा पूर्वी का केली नाही? एकंदरच, घोषणा महाराष्ट्रासाठी अभिमानाची असली तरी त्यामागील सरकारचा हेतू स्वार्थाचा होता, हे नाकारता येणार नाही. हे सर्व करण्यामागे उद्देश एकच आहे, भारतीय जनता पार्टीला महाराष्ट्र हातून जाऊ द्यायचा नाहीए. फोडाफोडीचे राजकारण असो, जनतेच्या हिताच्या योजना असो, मित्र पक्षांची मदत असो, कुठलीही तडजोड न करता सत्ता मिळवायची हेच आता लक्ष्य आहे.

काल-परवा अमित शाह मुंबईत येऊन गेले. सन २०२९ मध्ये भाजपा स्वबळावर सत्तेत येईल, हे त्यांचे वाक्य भाजपचे मनसुबे काय, हे स्पष्ट करून गेले. त्यांना २०२९ मध्ये स्वबळावर सत्ता आणायची आहे. त्यासाठी आता भाजपचा मुख्यमंत्री असणे आवश्यक आहे. एकीकडे देवेंद्र फडणवीस म्हणतात, की निवडणूक एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वात महायुती लढणार आहे आणि दुसरीकडे अमित शाह म्हणतात, २०२९ मध्ये भाजप स्वबळावर सत्तेत येईल. एकनाथ शिंदे यांनी आता हे समजून घ्यायला हवे, नेतृत्त्वात निवडणूक लढविणे म्हणजे पुन्हा मुख्यमंत्री बनणे नव्हे! भाजपचा हा स्वभाव आहे. सत्तेसाठी वापर करून घ्यायचा आणि नंतर फेकून द्यायचे. त्यामुळे अमित शाह यांच्या बोलण्याचा मथितार्थ समजून महायुतीतील घटक पक्षाने अलर्ट व्हायला हवे, पण तसे होणार नाही. ज्या कारणामुळे शिंदे आणि अजित पवार गट महायुतीत गेले त्या कारणाची चावी अजूनही भाजपच्या हातात आहे. त्यामुळे महायुती म्हणून निवडणूक लढविण्याशिवाय आणि निवडणुकीनंतरही भाजप जो निर्णय लादेल त्या निर्णयाला सहमती देण्याशिवाय या दोघांकडेही पर्याय नसेल, हेच सत्य आहे.

महायुतीच्या बाहेर जाऊन थोडं जरा देवेंद्र फडणवीस....सॉरी ... देवा भाऊंकडे वळू या. महाविकास आघाडी सरकार पडल्यानंतर नवे मुख्यमंत्री देवाभाऊ होतील असेच सर्वांना वाटले होते. मात्र, त्यांचे पंख छाटण्यासाठी अमित शाह यांनी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केले, असा संदेश राज्यातल्या भाजप कार्यकर्त्यांत गेला. शाहांविरुद्ध इतका रोष की आजही नागपुरात फडणवीस यांच्या कुठल्याही होर्डिंगवर अमित शाह यांचा फोटो लागत नाही. असे असताना अमित शाह यांनी देवाभाऊबाबत केलेले वक्तव्य पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाच्या आशा पल्लवीत करणाऱ्या आहेत. पुढील मुख्यमंत्री हेच टार्गेट घेऊन स्वतःची देवाभाऊ ही ब्रॅण्डिंग त्यांनी सुरू केली आहे. कदाचित लाडकी बहीण योजनेचा इंपॅक्ट मिळावा म्हणून 'देवा भाऊ' ही ब्रॅण्डिंग त्यांनी सुरू केली असावी. मात्र, जो भारदस्तपणा देवेंद्र फडणवीस या पूर्ण नावात आहे, तो भारदस्तपणा आता नव्याने ब्रॅण्डिंग होत असलेल्या नावात नाही. पदाधिकारी, कार्यकर्ते काय नेता जे करतो तेच योग्य या मताचे असतात, पण जरा जनतेमध्ये सुरू असलेल्या कुजबुजीचा कानोसा घ्या. नाहीतर हाच 'देवा-भाऊ ब्रँड सत्तेपासून दूर नेईल. देवेंद्र फडणवीस हाच एक ब्रँड आहे. सरकारच्या योजना लोकांच्या हिताच्या असेल तर त्याचा फायदा निवडणुकीत सत्ता पक्षाला होईलच. या योजनांची जनजागृती करण्यासाठी सरकारी यंत्रणा आहे. जनजागृती झालीच पाहिजे, पण सध्या त्याची जी ब्रॅण्डिंग सुरू आहे, त्याचा हेतू वाईट आहे, इतकेच.'

वास्तव

प्रा. मधुकर चुटे
9420566404
madhukarchute@gmail.com

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा: ऐतिहासिक निर्णय

नुकतेच केंद्र सरकारने दीर्घकाळच्या प्रतीक्षेनंतर महाराष्ट्र राज्यातील मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. माय मराठीच्या इतिहासातील हा एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय आहे. इतिहासासह आधुनिक रूपातही आपले भाषिक सौंदर्य जपणाऱ्या आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन राज्यातील मराठी माणसाचा अभिमान उंचावला आहे. राज्यात गेल्या अनेक वर्षांपासून ही मागणी करण्यात येत होती. राज्यातील अनेक सरकारांनी ही मागणी लावून धरली होती. जी अखेर मराठी भाषा ही अभिजात भाषा होती आणि आहे, हे आता केंद्र सरकारने मान्य केलेले आहे. जी नक्कीच कौतुकास्पद आणि अभिनंदनीय बाब आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे आता मराठी भाषा देशातील ४५० विद्यापीठांमध्ये शिकवली जाईल. तसेच संपूर्ण जगात मराठी भाषेचा विस्तार मोठ्या प्रमाणात होण्यास मदत होऊ शकेल. मराठी माणसाच्या अनेक वर्षांपासूनच्या लढ्याला मोठे यश आले आहे. या निमित्ताने राज्यात मराठी भाषेला अधिक भक्कम करण्याची आवश्यकता आहे.

आज राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात मराठी शाळांची स्थिती अत्यंत बिकट आहे. खासगी तसेच महापालिकेच्या शाळेत अत्यंत कमी प्रमाणात मुले-मुली शिकत आहेत. अशा बिकट परिस्थितीत राज्यात मराठी टिकवण्याचे अमराठी प्रयत्नही जेव्हा सरकारकडून पाहायला मिळतात तेव्हा ती आश्चर्यचकित करणारी बाब आहे. आज राज्यात मराठी भाषा टिकवून ठेवायची असल्यास इंग्रजी भाषा ही जशी संवाद आणि संपर्काबरोबरच रोजगार-व्यवसाय उपलब्ध करून देणारी भाषा झाली आहे तसाच प्रयत्न मराठी भाषेकरिता मोठ्या प्रमाणात होणे अत्यंत गरजेचे आहे. जर असे झाल्यास मराठी भाषा शिकणाऱ्यांना रोजगाराची शाश्वती मिळेल, तसेच मोठ्या प्रमाणात नोकऱ्या उपलब्ध होतील आणि मराठी भाषा, संस्कृती, इतिहास अशा विविध माध्यमातून संशोधनाची मोठी संधी उपलब्ध होऊ शकते. आज मराठी भाषेतील निर्माण झालेले अडथळे दूर होणे अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात.

आज राज्यात मराठी भाषिक सर्वेक्षण होणे गरजेचे आहे, कारण नाटक, सिनेमा, ग्रंथालय, साहित्य संमेलन, राज्य मराठी विकास संशोधन संस्थेमार्फत तयार केले जाणारे विविध प्रकारचे कोष हे सगळे प्रकल्प मराठी भाषेच्या संवर्धनासाठी हातभार लावणारे आहेत, यात काही शंका नाही; परंतु एखादी भाषा टिकवून राहायची असेल तर तिच्याविषयी आपुलकी आणि गोडी निर्माण होणे तेवढेच महत्त्वपूर्ण ठरते. याकरिता प्रत्येक घरातून मराठी भाषेविषयी आग्रह धरला गेला पाहिजे. तशी मानसिकता तयार करणे आणि मराठी भाषा शिकणाऱ्यांचा असाही चांगला सन्मान होऊ शकतो. त्यांना रोजगाराची चिंता राहात नाही ही जर हमी सरकारमार्फत देता आली तर इंग्रजीऐवजी मराठी भाषा शिकवणाऱ्यांचे प्रमाणही निश्चितपणे वाढू शकेल.

आज संगणक हे जगाचे सर्वात मोठे साधन झाले आहे आणि या संगणक प्रणालीवर मराठी भाषेचे अस्तित्व निर्माण करण्याचा अतिशय व्यापक प्रयत्न व्हायला पाहिजे. संगणकीय वापरामध्ये अनेक इंग्रजी शब्द असतात. त्यांना पर्यायी मराठी शब्द दिले जातात. एखादा संदेश पाठवताना वापरले जाणारे भावचिन्ह म्हणजे ज्यांना संगणकीय भाषेत इमोजी असे म्हटले जाते. त्यात मराठी परंपरांचे दर्शन घडवणाऱ्या चित्रांचा पाठपुरावा होणे गरजेचे आहे. ज्यांच्या माध्यमातून हा प्रकार प्रसारित केला जातो त्या गुगल, ट्विटर, फेसबुकला मराठी भाषाचिन्हांच्या वापराचा आग्रह करण्याची गरज आहे आणि ही गोष्ट शासकीय स्तरावरून तसेच राज्य मराठी विकास संस्थेने जर त्यात पुढाकार घेतला तर संगणक वापरात मराठीचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करता येऊ शकेल. आधुनिक साधनांवर विविध प्रकारची माहिती जर आपल्या भाषेत उपलब्ध झाली तर त्याचा एक वेगळा परिणामही साधला जाऊ शकतो. याकरिता या संगणक प्रणालीत मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्याकरिता स्वतंत्र संशोधन होण्याची गरज आहे. यासाठी मोठ्या स्तरावर संशोधन प्रकल्प हाती घेता येऊ शकतो. अशा पद्धतीने बदलत्या काळाचा वेध घेऊन प्रदीर्घ काळ उपयुक्त ठरणाऱ्या गोष्टी करण्याची आवश्यकता आहे.

आजही मराठी भाषा टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने ठोस प्रयत्न होत असल्याचे दिसत नाही. नव्या पिढीमध्ये मराठीविषयी आकर्षण निर्माण करायचे असेल तर सर्व आधुनिक माध्यमांवर मराठीचा वापर सुरू केला गेला पाहिजे. आणि याचा पाठपुरावा करण्याकरिताच आधुनिक समाजामध्ये आणि मराठीचा वापर असा विषय घेऊन सातत्याने चर्चा, परिसंवाद आणि संशोधन प्रकल्प हाती घेतले गेले पाहिजे.

मराठी भाषा टिकवण्याच्या दृष्टिकोणातूनच संघटित प्रयत्न करण्याची तेवढीच गरज आहे. राज्य सरकारने मराठी विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा केली होती, पण या विद्यापीठाचे स्वरूप कसे असेल याचा आराखडा प्रभावशालीपणे असणे आवश्यक आहे. मराठी विद्यापीठातून सुवर्णपदक मिळवलेला विद्यार्थी या राज्याच्या माहिती तंत्रज्ञानाचा प्रमुख होणार आहे का, किंवा त्याच्या या मराठीतल्या गुणवत्तेमुळे तो मुख्य सचिव होणार आहे का, एवढेच नव्हे तर सर्व शासकीय कार्यालयामध्ये मराठी भाषेत उत्तम गुण मिळवलेल्यांना प्राधान्य दिले जाणार आहे का, अशा काही रोजच्या जीवनाशी संबंधित उत्तरे सामान्यांना मिळणेही महत्त्वाचे आहे.

राज्यात मराठीची अस्मिता टिकवून ठेवण्यासाठी शालेय स्तरापासून मराठीची आवड निर्माण करण्यासाठी पुरस्कार आणि शिष्यवृत्त्या दिल्या पाहिजेत. आज मराठी भाषा घेऊन पदव्युत्तर अभ्यास करणाऱ्यांना किंवा संशोधन करणाऱ्यांना कोणती आश्वासक अशी शिष्यवृत्ती विद्यापीठामार्फत उपलब्ध नाही. राज्यात किमान शंभर विद्यार्थ्यांना पाच वर्षांसाठी मराठी विषयक संशोधनासाठी दरमहा दहा ते वीस हजार रुपयांची शिष्यवृत्ती तसेच पाचवी ते बारावी या काळात मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्यांना विशेष पुरस्कार देण्याचे प्रयत्न होणेही गरजेचे आहे. चित्रपट, नाटक, संमेलनांवर पैसे उधळण्यापेक्षा पुढच्या पिढीची शिदोरी असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राज्यात मराठीला टिकविण्यासाठी, हे उपाय जास्त महत्त्वपूर्ण ठरतात.

चळवळ

प्रा.डॉ. इसादास भडके
9096364886
erbfes@gmail,com

शाहीर रामचंद्र आंडागळे व शाहीर लक्ष्मण राजगुरू!

शाहीर रामचंद्र आंडागळे यांचा जन्म १८९० च्या दरम्यान धांदरफळे, जि.अहमदनगर येथे झाला. त्यांनी सामाजिक, राजकीय, धार्मिक, विषयावर गाणी लिहिली. डॉ.बाबासाहेबांनी केलेली आंदोलने हा त्यांच्या लेखनाचा विषय ठरला. अनेक शाहिरांनी महाडच्या चवदार तळ्यावर आपली लेखणी परजली. त्याला शाहीर आंडगळेही अपवाद नव्हते. ते महाडच्या चवदार तळ्याच्या संदर्भात लिहितात की, ''झुजले झुंजार वीर। रणी रणशूर। मर्द बहादूर महाडमुक्कामी चवदार तळ्यावर। रणशिंग फुंकले क्रांती प्रखर। मार्च सत्तावीस लढा अनिवार...'' शाहीर आंडागळे यांनी चवदार तळ्यावर केलेले भाष्य हे शूरविराचं स्मरण करणारे आणि लढ्याचे व्यापकत्त्व सिद्ध करणारे आहे. अस्पृश्यता या प्रश्नांनी मानवी जीवन विकलांग केले होते. अस्पृश्यता हा महारोग असून देशाला कलंकित करणारा आहे असे ते म्हणत. डॉ. बाबासाहेब नावाचे डॉक्टरच हा डाग मिटवू शकतात, असा विश्वास प्रकट करताना म्हणतात की, 'हिंदुस्थान देशातून जातीभेद घालवा, अस्पृश्यता हा महारोग। हिंदुस्थान; पडला डाग। करा ऑपरेशन भीमराव। डॉक्टर बोलावा.'

शाहीर आंडागळे यांनी तत्कालीन वृत्ती-प्रवृत्तीवर भाष्य करत ढोंगी पुढाऱ्यांवर हल्ला चढविला. बोलघेवडे पुढारी गरिबाचं वाटोळ करतात. त्यांना समाजहिताचे काही करायचे नाही तर ते स्वार्थ जोपासतात असे म्हणतात. ते लिहितात की, 'जनता ही भोळीभाळी पुढारी झाले फार-फार, कार्य हे तुमचे आमचे पैसे की जनतेचे' 'शाहीर आंडागळे यांनी समाजातील एकजुटीचा विचार आपल्या कवणातून मांडताना बाबासाहेब हे आमचे सर्वस्व आहेत, असे सांगताना म्हणतात की, 'ध्यान धरा रे एकी करा हीच वेळ खरी, तलिता किती सांगू का येईना ध्यानीमनी, भीमाविण नसे कोणी आम्हा धनी.' बाबासाहेब हे समतेचे धनी आहेत. असे म्हणताना लिहितात की, 'धन्य रामजीच्या बाळा कोण जाणे तुमची कळा, समता माळणीचा मळा, तुम्ही त्याचे धनी.'

पुणे करार अर्थात गांधी-आंबेडकर करार', 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण- चरित्र,' काही समाजोन्नतीपर एकपात्री भजने', 'भीमप्रताप संदेश', व 'बिगुल' या त्यांच्या पुस्तिका आहेत. 'भीमकळा', हे त्यांचे दीर्घकवण लोकप्रिय आहे. १९३२ ते १९४८ या कालखंडात शाहीर आंडागळे यांनी आंबेडकरी विचारांची बांधिलकी स्वीकारून जलसा चळवळ चालविली आणि आंबेडकरी चळवळीला गतिमान केले. चळवळीचे कार्य करीत असतानाच १९४८ साली त्यांचा मृत्यू झाला.

शाहीर लक्ष्मण राजगुरू पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील मालठण येथे शाहीर लक्ष्मण राजगुरू यांचा १९३४ साली जन्म झाला. ते आंबेडकरी चळवळीत सक्रिय होते. १९५० च्या सुमारास त्यांनी आपल्या लेखनास प्रारंभ केला. चळवळीला सर्वस्व मानून ते चळवळीकरिता जगले. 'राजगुरू आणि संच' स्थापन करून शाहीर लक्ष्मण राजगुरू यांनी बाबासाहेबांचा विचार सर्वत्र पोहचवला. 'दीनाचा धनी' व 'बुद्ध भीमाची ओवी' या त्यांच्या गाजलेल्या लोकप्रिय रचना आहेत. 'माझ्या खंबीर नेत्यानं, पाणी चाखलं तळ्याचं' त्यांनी जीवाच्या पल्याड, केलं राखण मळ्याचं।।धृ।। ही रूपकात्मक आणि प्रतिकात्मक रचना लक्ष्मण राजगुरू यांच्या प्रगल्भ व विकसित लेखनशैलीचा परिचय आणून देणारी आहे. बाबासाहेबांनी आपल्याला बौद्ध तत्त्वज्ञान दिलं. बौद्ध धम्म दिला. परंपरेत गुंतलेल्यांना नवजीवन दिले. नव्हे आयुष्याला मानवतेचा आयाम प्राप्त करून दिला. अष्टशीलाचा मार्ग दाखविला. दीक्षाभूमी दिली. जगण्याचे बळ दिले. सारेच दिले पण आता समाज विखुरला आहे, याची खंतही लक्ष्मण राजगुरू व्यक्त करतात. 'नऊ कोटीच्या संगतीने भीम-बुद्धाच्या नावाने ताईत बांधले.' असे प्राजंळपणे आंबेडकरी चळवळीशी ते नाते सांगतात.

'दीनाची धनी' या लोकप्रिय रचनेतून शाहीर राजगुरू आंबेडकर, महात्मा फुले, संत कबीर, शिवाजी महाराज, गौतम बुद्ध यांच्या समताधिष्ठित विचारांची रूजवणूक जनमानसात करतात. ते लिहितात की, 'गरिबानंदी गरीब घरचा जन्मला एक हिरा, नाव तयाचे सांगतो ऐकून घे शाहिरा, असाच झाला नाही कुणी, असा होणार नाही कुणी, दीनाचा धनी।। धृ।।

डॉ.बाबासाहेबांच्या कार्याला तोड नाही. बाबासाहेबांनी दीक्षा देऊन नऊ कोटींचा उद्धार केला. असा कोणीच जन्मला नाही असे शाहीर राजगुरू सांगतात. 'भीमरायाचे खंबीर नेतृत्त्व, अस्पृशांच्या उद्धारासाठी झटणारे महात्मा फुले, सुभेदाराच्या सुनेला बहीण मानून सन्मान करणारे शिवाजी महाराज, ज्ञानाचा सागर असलेले संत कबीर, सत्यशोधक आणि शांतीदूत गौतम बुद्ध या सर्वांचे आदर्श लोकमानसात रूजविण्याचे महान काम राजगुरू यांच्या गीतांनी केले आहे. आजही हे गीत आदर्शवत ठरणारे आहे, हे राजगुरू यांच्या गीताचे सामर्थ्य आहे.' असे जे अभ्यासक - संशोधक प्रा.डॉ. महेंद्र भवरे म्हणतात. त्याची सत्यता पटल्याशिवाय राहात नाही. राजगुरू हे निर्गवी, निःस्वार्थी व प्रामाणिक कलावंत- कार्यकर्ते होते. याबद्दल कुणाचेही दुमत नाही.

'मुक्ताई' आंबेकर ले आउट- चंद्रपूर

वाचक विचार मंच

नवरात्रौत्सवात भक्तिरसात न्हाऊन, सुखाचे क्षण वेचूया!

लाडक्या गणरायाला अनंत चतुर्दशीच्या दिवशी निरोप दिल्यानंतर बघता बघता पितृपक्षही संपला आणि आता शारदीय नवरात्र सुरू झाले आहे. पुन्हा एकदा घरोघरी पावित्र्याचे आणि आनंदाचे वातावरण पसरले आहे. आता येणाऱ्या नऊ दिवसात म्हणजे आश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षातील प्रतिपदा ते आश्विन शुद्ध नवमीपर्यंत देवीची उपासना केली जाईल. कलशामध्ये, घटामध्ये देवीची स्थापना करून नंदादीप प्रज्वलित करून आदिशक्तीची नऊ दिवस मनोभावे पूजा केली जाईल. घटस्थापनेला देवीचे रुप मानले आहे. या कलशाच्या रुपात देवीचे घरात आगमन होते असे मानले जाते.

नवरात्रीच्या नऊ दिवसात देवीच्या विविध रुपांची पूजा केली जाते. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी दुर्गेचा पहिला अवतार असलेल्या शैलपुत्री देवीची पूजा केली जाते. दुसऱ्या दिवशी ब्रह्मचारिणी देवी, तिसऱ्या दिवशी

चंद्रघंटा, चौथ्या दिवशी कुष्मांडा, पाचव्या दिवशी स्कंदमाता, सहाव्या दिवशी कात्यायनी, सातव्या दिवशी कालरात्री, आठव्या दिवशी महागौरी आणि नवव्या दिवशी सिद्धीदात्री देवीच्या नवव्या अवताराची पूजा केली जाते. आदिमाया, आदिशक्तीच्या उपासनेच्या नवरात्रौत्सवातील या काळात सर्वत्र पसरलेल्या आल्हाददायक आणि आनंददायी वातावरणात भक्तिरसात न्हाऊन जाऊया आणि सुखाचे क्षण वेचूया!

**

मिर्झापूरमध्ये भीषण अपघातात १० जणांचा मृत्यू

भरधाव ट्रकची ट्रॅक्टरला धडक

वृत्तसंस्था

मिर्झापूर : उत्तर प्रदेशातील मिर्झापूर येथे भीषण अपघात झाला आहे. कच्छवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कटका पडावजवळ ट्रक आणि ट्रॅक्टर यांच्यात झालेल्या धडकेत १० मजुरांचा मृत्यू झाला. तीन जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी वाराणसीतील ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आले आहे. सर्व मजूर वाराणसीचे रहिवासी होते.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, अपघाताच्या वेळी ट्रॅक्टर-ट्रॉलीमध्ये सुमारे १३ मजूर प्रवास करत होते. औरईच्या तिवारी गावातून काम करून सर्व मजूर वाराणसीला परतत होते. यावेळी दुपारी १२.३० च्या सुमारास हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. या अपघाताची माहिती मिळताच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून मदतकार्य सुरू केले. या अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी वाराणसी-प्रयागराज महामार्ग रोखून धरला असून प्रशासन नाराजांची समजूत काढण्यात व्यस्त आहे. भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रक पहिले दुचाकीला धडकला असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. यानंतर ट्रकचे नियंत्रण सुटले आणि ट्रॅक्टर-ट्रॉलीला धडकली. अपघातानंतर ट्रॉली नाल्यात पडली. त्याचवेळी ट्रकही नाल्यात पडला. अपघातानंतर घटनास्थळी एकच आरडाओरड सुरु झाली.

मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठवले

अपघाताबाबत सीओ अमर सिंह यांनी सांगितले की, पोलिसांना रात्री १२.३० च्या सुमारास अपघाताची माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठून सर्वांना बाहेर काढले. यानंतर रुग्णवाहिका बोलावण्यात आली आणि अपघातात जखमी झालेल्यांना वाराणसीला पाठवण्यात आले. तसेच सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी शवागृहात पाठवण्यात आले. एसपी अभिनंदन म्हणाले की, ट्रकने ट्रॅक्टर ट्रॉलीला मागून धडक दिली. अपघातात सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी शवागृहात पाठवण्यात आले. ट्रक चालकाने घटनास्थळावरून पळ काढला. ट्रक ताब्यात घेण्यात आला. याप्रकरणी एफआयआरही दाखल करण्यात आला आहे. पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहितीही पोलिस अधीक्षकांनी दिली.

सर्व मुस्लीम राष्ट्रांचा समान शत्रू; त्याचा एकत्र मुकाबला करा- आयोतुल्ला खामेनी

वृत्तसंस्था

तेहरान : इराणचे सर्वोच्च नेते आयोतुल्ला खामेनी यांनी जगभरातील इस्लामिक राष्ट्रांना समान शत्रूचा पराभव करण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. खामेनी यांनी शुक्रवारच्या नमाज पठणानंतर तेहरान येथील मशिदीत हे भाषण केले. खामेनी यांनी पाच वर्षांनंतर प्रथमच हे भाषण केले आहे. यावेळी हजारोंच्या संख्येने इराणी नागरिक उपस्थित होते.

इराणने काही दिवसांपूर्वी इस्रायलवर क्षेपणास्त्र डागली होती, तसेच ७ ऑक्टोबर २०२३ ला हमासने इस्रायलवर हल्ला केला होता, हे दोन्ही हल्ले वैध असल्याचे खामेनी यांनी म्हटले आहे. हमासने इस्रायलवर केलेल्या हल्ल्यानंतर मध्य्यू-पूर्वेतील स्थिती अतिशय बिकट बनलेली आहे.

इस्रायलने गाझा पट्टीत कारवाई, तसेच लेबनॉनवर हल्ले चढवले आहेत. या हल्ल्यात लेबनॉनमधील बंडखोर संघटना हिजबुल्लाहचा म्होरक्या हसन नसरल्लाह काही दिवसांपूर्वी मारला गेला आहे. तर इस्रायलने इराणने केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांच्या बदला घेण्याचे सूतोवाच केले आहे.

इराणच्या आण्विक ठिकाणांवर हल्ला अमान्य; अमेरिकेने स्पष्ट केली भूमिका

वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर इस्रायलही मोठा पलटवार करण्याचा विचार करत आहे. इस्रायल इराणच्या आण्विक स्थळांना तसेच तेल सुविधांना लक्ष्य करू शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, अण्वस्त्र स्थळांवर इस्त्रायलने हल्ला केला तर त्या हल्ल्यांना अमेरिका पाठिंबा देणार नाही, असे अमेरिकेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

क्षेपणास्त्र हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणच्या आण्विक साइट्सवर कोणत्याही इस्रायली हल्ल्याचे समर्थन करणार नाही, असे अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन यांनीच नुकतेच सांगितले आणि इस्रायलला सबुरीने कारवाई करण्याचे आवाहन केले. इराणवर आणखी निर्बंध लादले जातील आणि लवकरच नेतान्याहू यांच्याशी चर्चा करणार असल्याचे बायडेन यांनी सांगितले. दरम्यान, एकाच वेळी अनेक आघाड्यांवर लढणाऱ्या इस्रायलमध्ये यंदाचे ज्यू नववर्ष युद्धाच्या छायेत घालवले जात आहे.

ब्रिटिश नागरिकांना ताबडतोब लेबनॉन देश सोडण्याचे आवाहन

देशोन्नती वृत्तसंकलन

युके: ब्रिटिश सरकारने जाहीर केले की ते लेबनॉनमधून आपल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी अधिक चार्टर्ड उड्डाणे सुरू केली आहेत. लेबनॉन आणि इस्रायलमध्ये सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. लेबनॉन आणि इस्रायलचे एकमेकांवर जोरदार हल्ले सुरू आहेत. फॉरेन, कॉमनवेल्थ अँड डेव्हलपमेंट ऑफिस (इण्अ्ध) ने सांगितले की, जोपर्यंत सुरक्षा परिस्थिती अनुकूल आहे तोपर्यंत ही अतिरिक्त उड्डाणे सुरू राहतील. यासोबतच एफसीडीने असेही म्हटले आहे की ते ब्रिटिश नागरिकांसाठी व्यावसायिक उड्डाणांची क्षमता वाढवण्यासाठी भागीदारांसोबत काम करत आहे.

ब्रिटनचे परराष्ट्र मंत्री डेव्हिड लॅमी म्हणाले, अलीकडील घटनांवरून लेबनॉनमधील परिस्थिती अस्थिर असल्याचे स्पष्ट झाले आहे. लेबनॉनमधील ब्रिटिश नागरिकांची सुरक्षा आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. म्हणूनच लेबनॉन सोडू इच्छिणाऱ्यांसाठी आम्ही अतिरिक्त चार्टर्ड फ्लाइट्सची घोषणा करत आहोत. त्यांनी यूकेच्या नागरिकांना एफसीडीओकडे नोंदणी करून लेबनॉन ताबडतोब सोडण्याचे आवाहन केले.

ब्रिटन मॉरिशसला 'चागोस' परत करणार!

देशोन्नती वृत्तसंकलन

लंडन : ब्रिटन आणि मॉरिशस यांच्यात अखेर चागोस बेटसमूहावरून करार झाला आहे. ब्रिटन हिंदी महासागरात स्थित सामरिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण चागोस बेटसमूहाला मॉरिशसला सोपविण्यास सहमत झाला आहे. या बेटावरून दोन्ही देशांदरम्यान ५० वर्षांपेक्षा अधिक काळापासून वाद सुरू होता. भारताने या वादाप्रकरणी उघडपणे मॉरिशसला साथ दिली होती.

कराराच्या अंतर्गत आम्ही चागोस बेटसमूहाचे सार्वभौमत्व मॉरिशसला सोपविणार आहोत. या करारानंतर दशकांपूर्वी बेटावरून विस्थापित झालेल्या लोकांना घरी परतण्याची मंजुरी मिळणार असल्याचे ब्रिटनने म्हटले आहे. तर दिएगो गार्सिया येथील युके-अमेरिकन सैन्यतळाचा वापर ब्रिटन करत राहणार आहे. ब्रिटन अमेरिकेसोबत मिळून चागोसच्या दिएगो गार्सिया बेटावर सैन्यतळाचे संचालन करतो, यामुळे दोन्ही देशांना हिंदी महासागरात रणनीतिक आघाडी प्राप्त होते. १९६०-७० च्या दशकात ब्रिटनने चागोस बेटसमूहावर वास्तव्य करणाऱ्या लोकांना तेथून हाकलले होते. या घटनेला मानवतेच्या विरोधातील गुन्ह्याच्या स्वरुपात पाहिले जाते. १९६८ मध्ये मॉरिशसला स्वातंत्र्य मिळाल्यावरही ब्रिटनने या क्षेत्रावरील कब्जा कायम ठेवला होता. या क्षेत्रावर १८१४ पासून ब्रिटनचे नियंत्रण राहिले आहे. ब्रिटनने मॉरिशस आणि सेशेल्सच्या सुमारे २ हजार रहिवाशांना तेथून हटविले होते आणि अमेरिकेला येथे सैन्यतळ निर्माण करण्यासाठी आमंत्रित केले होते. २०१९-२१ दरम्यान आंतरराष्ट्रीय न्यायालयानेदेखील मॉरिशसच्या बाजूने निर्णय दिला होता. ब्रिटनने १९६८ मध्ये स्वातंत्र्य देण्यापूर्वी चागोस बेटसमूहाला मॉरिशसपासून बेकायदेशीरपणे वेगळे केल्याची टिप्पणी न्यायालयाने केली होती.

५० वर्षांपासूनच वाद समाप्त

संसदीय स्थायी समितीतून जया बच्चन यांची माघार

नवी दिल्ली : समाजवादी पक्षाच्या राज्यसभा सदस्य जया बच्चन यांनी भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांच्या अध्यक्षतेखालील कम्युनिकेशन आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीविषयक संसदीय स्थायी समितीमधून माघार घेतली आहे. जया बच्चन यांच्या जागी तृणमूल काँग्रेसचे नेते साकेत गोखले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते कामगार संसदीय समितीचे सदस्य होते. राज्यसभा सचिवालयाच्या बुलेटिननुसार, जया बच्चन आता कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या अध्यक्षतेखालील कामगार, वस्त्रोद्योग आणि कौशल्य विकासविषयक संसदीय स्थायी समितीच्या सदस्या असतील.

'टॉयलेट सीट्स'वर लावला जाणार कर

सुखविंदर सिंग सुखू सरकारचा निर्णय

वृत्तसंस्था

शिमला : हिमाचल सरकारने घेतलेला कर निर्णय चांगलाच चर्चेत आला आहे. हिमाचल प्रदेशमध्ये घरात बसवलेल्या टॉयलेट सीटच्या संख्येनुसार कर भरावा लागणार आहे. या निर्णयाची चर्चा सध्या सर्वत्र होत आहे. एखाद्याच्या घरात जितक्या जास्त टॉयलेट सीट असतील तितका जास्त कर भरावा लागेल. आर्थिक संकटाचा सामना करत असलेल्या हिमाचलच्या सुखविंदर सिंग सुखू सरकारने हा निर्णय घेतला आहे. त्यासाठी अधिसूचनाही जारी करण्यात आली आहे. लोकांना सांगण्यात आले आहे की ते टॉयलेट सीटसाठी जेवढे पाणी वापरतात त्यानुसार त्यांच्यावर कर आकारला जाईल.

हिमाचल सरकारच्या आदेशानुसार, सरकारी अधिसूचनेत म्हटले आहे की, शहरी भागात राहणाऱ्या लोकांना आता घरात बसवलेल्या प्रत्येक टॉयलेट सीटसाठी २५ रुपये शुल्क भरावे लागेल. हे बिल मलनिस्सारण आणि पाणी बिलासह येईल. लोक जेवढे पाणी वापरतात त्यानुसार सांडपाण्याचे बिलही येईल. सीवरेज बिल एकूण पाणी बिलाच्या ३० टक्के असेल. अशा स्थितीत पाण्याचा अधिक वापर केल्यास मलनिस्सारणाचे बिलही जास्त येते.

न्यूयॉर्क : बांगलादेशातील हिंदूंचा नरसंहार थांबवण्याचे आवाहन हडसन नदीवर आणि स्टॅच्यू ऑफ लिबर्टीवर मोठ्या एअरलाइन बॅनरद्वारे करण्यात आले. हा मोठा बॅनर विमानातून हडसन नदीवर फडकवण्यात आला.

अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्री निवासस्थान सोडले

वृत्तसंस्था

नवी दिल्ली: आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी शुक्रवारी (दि.४) मुख्यमंत्री निवासस्थान सोडले. आता ते आपल्या कुटुंबासह नवी दिल्लीमधील एका नवीन ठिकाणी राहायला गेले आहेत. केजरीवाल कुटुंबासह नवी दिल्लीच्या मंडी हाऊस परिसरातील फिरोजशाह रस्ता बंगला क्रमांक ५ येथे राहण्यासाठी गेले आहेत. हे निवासस्थान आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार अशोक मित्तल यांना केंद्र सरकारकडून देण्यात आलेला बंगला आहे.

तत्पूर्वी, केजरीवालांसह त्यांच्या कुटुंबाने मुख्यमंत्री निवास्थानी असलेल्या कर्मचाऱ्यांनी प्रेमळ निरोप दिला, याप्रसंगी त्यांनी कर्मचाऱ्यांना मिठी मारली. दरम्यान, त्यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यांनी निवासस्थानाच्या चाव्या एका अधिकाऱ्याला दिल्या. यानंतर आप ने एक्स पोस्ट करत म्हटले आहे की, 'अरविंद केजरीवाल जोपर्यंत जनता दरबारात त्यांच्या प्रामाणिकपणाची पुष्टी करत नाहीत आणि त्यांना पुन्हा मुख्यमंत्री बनवत नाही तोपर्यंत ते मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी राहणार नाहीत'.

मंडी हाऊस परिसरात असणार वास्तव्य

विधानसभा उपाध्यक्ष झिरवाळ यांचे कृत्य अशोभनीय

संजय शिरसाट यांची प्रतिक्रिया

वृत्तसंस्था

नवी मुंबई : विधानसभा उपाध्यक्ष पदावर असणाऱ्या झिरवाळ यांनी असे कृत्य करणे त्यांना अशोभनीय आहे. त्यांच्या मागण्यांबाबत सरकार विचार करत आहे. त्यामुळे झालेला प्रकार अयोग्य आहे की योग्य याबाबत लोकांमध्ये संभ्रम निर्माण झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नरहरी झिरवाळ यांना भेटू शकतात. चर्चेतून मार्ग निघतात, असे म्हणत शिवसेना शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

नरहरी झिरवाळ हे दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी त्यांना भेटण्यासाठी पोहोचले होते, मात्र त्याठिकाणीही त्यांची भेट होऊ शकली नाही, असे सांगण्यात येत आहे.

डॉन अरुण गवळींची लेक निवडणूक लढवणार?

भायखळा : राज्यात सध्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असाच थेट सामना राज्यात होणार आहे. यादरम्यान सगळ्यांचे लक्ष मुंबईकडे लागले आहे. मुंबईत शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना बहुतांश जागांवर होणार आहे. यादरम्यान मुंबईतील कुख्यात डॉन अरुण गवळी यांच्या कन्या गीता गवळी विधानसभेसाठी ठाकरे गटाकडून मशालीवर लढणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

सूरतमधील हिरे उद्योग संकटात काँग्रेसचा दावा

वृत्तसंस्था

अहमदाबाद : गुजरातच्या सूरतमधील प्रसिद्ध हिरे उद्योग संकटात सापडला आहे. त्या उद्योगातील कामगारांपुढे उपजीविकेचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे, असा दावा काँग्रेसने केला. तसेच, स्थिती सुधारण्यासाठी केंद्र सरकारकडे लक्ष घालण्याची मागणी केली. काँग्रेसचे गुजरात प्रदेशाध्यक्ष शक्तिसिंह गोहिल यांनी रशिया-युक्रेन युद्धामुळे हिरे उद्योगाला मंदीने ग्रासल्याकडे आणि कामगारांना बेरोजगारीची समस्या भेडसावू लागल्याकडे लक्ष वेधले. अनेक कामगारांनी रोजगार गमावले. त्यातील काहींनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. भारतात कटींग आणि पॉलिशिंगसाठी रशियन हिऱ्यांची आयात होते. त्या हिऱ्यांची निर्यात पाश्चिमात्य देशांच्या बाजारपेठांत तसेच चीन, संयुक्त अरब अमिराती आणि हॉंगकॉंगला होते.

रशियात मोठ्या प्रमाणात कच्च्या हिऱ्यांचे खनन होते. त्या हिऱ्यांवरील बंदीमुळे गंभीर स्वरूपाचा पेच निर्माण होऊनही केंद्र आणि राज्य सरकारांनी कामगारांना दिलासा देण्यासाठी कुठलेही पाऊल उचलले नाही, असा आरोप त्यांनी केला. अमेरिका, ब्रिटनसह जी ७ देशांकडे रशियन हिऱ्यांवरील बंदीचा मुद्दा केंद्र सरकारने का उपस्थित केला नाही?

पॉलिश्ड हिऱ्यांची किंमत घटली

गुजरातमध्ये रोजगार पुरवण्याबाबत आघाडीवर असणाऱ्या क्षेत्रांत हिरे उद्योगाचा समावेश होतो. त्या उद्योगावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सुमारे २५ लाख कुटुंबे अवलंबून आहेत. सूरतसह गुजरातमधील विविध ठिकाणी हिरे पॉलिशिंग कारखाने आहेत. भारताच्या हिरे निर्यातीत लक्षणीय घसरण झाल्याचे अधिकृत आकडेवारीवरून स्पष्ट होते.

कामगारांच्या उपजीविकेचा प्रश्न

बर्ड फ्लूमुळे १२ हून अधिक वाघांचा मृत्यू!

मृत्यू झालेल्या वाघांचे अवशेष जाळले

वृत्तसंस्था...

हनोई : बर्ड फ्लूच्या संसर्गामुळे दक्षिण व्हिएतनाममध्ये हाहाकार माजला आहे. येथील प्राणीसंग्रहालयात बर्ड फ्लूची लागण होऊन १२ हून अधिक वाघांचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. संसर्गामुळे मृत्युमुखी पडलेल्या वाघांचे अवशेष जाळण्यात आले आहेत. अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. राज्य माध्यम व्हीएनएक्सप्रेसने बीएन होआ शहरातील वुन जोई प्राणीसंग्रहालयाच्या रक्षकाचा हवाला देत म्हटले आहे की प्राण्यांना जवळच्या शेतातून आणलेली कोंबडी खायला देण्यात आली होती.

मारल्या गेलेल्या प्राण्यांमध्ये पँथरसह २० वाघ आणि अनेक शावकांचा समावेश होता, ज्यांचे वजन १० ते १२० किलो दरम्यान होते. त्याच्या पार्थिवावर प्राणिसंग्रहालयाच्या आवारात अंत्यसंस्कार करण्यात आले.

दिल्ली शहरात नवे ड्रग सिंडिकेट सक्रिय

राजधानीत ६४ हॉट स्पॉट्सची ओळख

वृत्तसंस्था...

नवी दिल्ली : दिल्ली पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या सर्वेक्षणानुसार, राष्ट्रीय राजधानीत अशा ६४ हॉट स्पॉट्सची ओळख पटली आहे, जिथे प्रतिबंधित अंमली पदार्थांची तस्करी केली जाते. नॉर्थ कॅम्पस हे हॉट स्पॉट्सच्या यादीत समाविष्ट असलेल्या ठिकाणांपैकी एक आहे. दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने २ ऑक्टोबर रोजी दक्षिण दिल्लीत छापा टाकला होता आणि ५०० किलो पेक्षा जास्त कोकेन जप्त केले होते, ज्याची किंमत सुमारे ५६०० कोटी रुपये आहे.

राष्ट्रीय राजधानीत आजवरचा हा सर्वात मोठा ड्रग्ज बस्ट असल्याचे बोलले जात आहे. याप्रकरणी स्पेशल सेलने ५ व्या आरोपीला अटक केली आहे.

६ ते ११ ऑक्टोबरदरम्यान १२ वी पर्यंतच्या शाळा बंद राहणार!

नवी दिल्ली : देशातील अनेक राज्यांमध्ये मुलांच्या परीक्षा सुरू आहेत. येथे, तेलंगणा स्टेट बोर्ड ऑफ इंटरमीडिएट एज्युकेशन (ऊएँ) ने अधिकृतपणे राज्यभरातील कनिष्ठ महाविद्यालयांसाठी पहिल्या सत्राच्या सुट्ट्यांची घोषणा केली आहे. अधिकृत निवेदनानुसार, सरकारी, खाजगी अनुदानित, खाजगी विनाअनुदानित, सहकारी आणि कल्याणकारी महाविद्यालयांसह दोन वर्षांचे इंटरमिजिएट अभ्यासक्रम देणारी सर्व महाविद्यालये ६ ते १३ ऑक्टोबरपर्यंत बंद राहतील.

अधिकृत नोटीसमध्ये म्हटले आहे की, सर्व सरकारी/ खाजगी अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित/ सहकारी/ टीजी निवासी/ टीजी समाज कल्याण निवासी/ टीजी आदिवासी कल्याण निवासी/ टीजी मॉडेल स्कूल्स/ टीजी बीसी कल्याण/ टीएमआरजेसी/ केजीबीव्ही/ प्रस्ताना कनिष्ठ महाविद्यालये आणि संमिश्र प्राचार्य दोन वर्षांचे इंटरमिजिएट कोर्सेस ऑफर करणाऱ्या कॉलेजांना कळवण्यात येते की, कनिष्ठ महाविद्यालयांसाठी ०६-१०-२०२४ ते १३-१०-२०२४ (दोन्ही दिवस समावेशी).

माजी भाजप खासदाराच्या घरावर बॉम्ब हल्ला!

पश्चिम बंगालमधील घटनेने खळबळ

कोलकाता: पश्चिम बंगालमधील विरोधी पक्षांच्या राजकारण्यांच्या घरांवर होणाऱ्या हल्ल्यांची मालिका थांबताना दिसत नाही. भाजप नेते, बराकपूरचे माजी लोकसभा खासदार अर्जुनसिंह यांच्या घरावर गोळीबार व बॉम्बने हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात ते जखमी झाले आहेत. यापूर्वीही त्यांच्या घरावर असे हल्ले झाले असून २०२१ मध्ये दोनदा हल्ला झाल्याची नोंद आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की, अर्जुनसिंह यांच्या घरावर आज सकाळी बाईकस्वार गुंडांनी हल्ला करत अचानक बॉम्बफेक सुरू केली. यावेळी हल्लेखोरांकडून गोळीबारही करण्यात आला आहे. बॉम्बचा आवाज ऐकून माजी खासदार जेव्हा घराबाहेर पडले असता बॉम्बचा तुकडा त्यांच्या पायावर पडल्याने ते गंभीर जखमी झाले. सध्या परिसरात प्रचंड तणावाचे वातावरण आहे. अर्जुनसिंह यांनी सांगितले की, तृणमूल काँग्रेसचे स्थानिक नगरसेवक सोमनाथ श्याम यांचा मुलगा या घटनेला जबाबदार आहे.

बप्पासाहेब घुगेवर कारवाई का नाही,दया दाल में कुछ काला हैं!

हॉटेल गोल्डन चॉईसच्या मॅनेजरला घेतले ताब्यात

स्थानिक घेणार एसपी, पालकमंत्र्यांची भेट

नागरिक म्हणाले हॉटेलच्या नावाखाली काळे धंदे?

हॉटेलात छुपे कॅमेरे तर लावले नाहीत ना?

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी रोडवरील गोल्डन चॉईस हॉटेल,लॉज मध्ये बऱ्याच दिवसापासून बिनधास्त नंगानाच सुरू असल्याच्या तक्रारी होत्या. शहरातील हॉटेल,लॉज फक्त जोडप्यांना भेटण्याचे ठिकाण झाले होते.दि.४ ऑक्टोबर रोजी दुपारच्या वेळी दोन वेगवेगळ्या जातीचे जोडपे या लॉज मध्ये गेल्याची अफवा बीड शहरात पसरली त्यामुळे एका धर्मातील लोक या लॉजच्या समोर जमा होऊन लॉजमध्ये घुसण्याचा प्रयत्न करत गोंधळ घालत राडा केला होता.पोलिसांनी वेळेवर आल्याने पुढील अनर्थ टाळला, त्या चौघांना पोलिसांनी ताब्यात घेऊन शहर पोलीस ठाण्यात चोकशीसाठी घेऊन जात असताना संताप जमावाने त्या जोडप्यावर व पोलिसाच्या वाहनावर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याने काही काळ तणावाची परस्थिती निर्माण झाली होती.त्यामुळे जमावातील काहिवर पोलिसांनी गुन्हा दखल केला.त्या जोडप्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन वय बाबद अधिक तपासणी, पुरावा पाहिला असता एक मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती समोर आल्याने त्या मुलावर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून अल्पवयीन जोडप्यांना मुलीला रूम दिल्या प्रकरणी हॉटेल गोल्डन चॉईसच्या मॅनेजरवर गुन्हा दाखल करण्यात आला त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले. हॉटेल गोल्डन चॉईस चे बाप्पसाहेब घुगे वर देखील गुन्हा दाखव करण्यात यावा अशी मागणी होत आहे. बीड शहरातील काही पैशासाठी लॉज वाल्यांनी लाजा सोडल्या अशी चर्चा नागरिक दिवसभर करत आहेत.त्या हॉटेल,लॉज मधिल सीसीटीव्ही कॅमेरे रजिस्टर तपासली जाणार आहेत.त्यातून सत्य बाहेर येईल.पुढील तपास शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ हे करत आहेत.श्री.संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान हा रहिवासी (रिसीडेशियल)भाग असून या भागात लॉज झाल्यापासून स्थानिक रहिवाश्याना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मुली,महिला लॉज मध्ये जाण्याच्या पान २ वर...

ईच्छूक उमेदवारांनी दिल्या मुलाखती!

पडघम:निष्ठावंतांना न्याय की फितूरांना पायघड्या?

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान सभा निवडणूकीचे स्वयंवर जवळ येऊन ठेपले आहे.सर्वच पक्ष वर चाचपणी करत आहेत.राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पक्षाच्या वतीने निसर्ग मंगल कार्यालय,मार्केट यार्ड पुणे येथे खा.शरदचंद्र पवार यांचे सह पक्षाचे पार्लमेंट्री बोर्ड दि.५ ते ७ ाक्टोबर २०२४ दरम्यान सर्व ईच्छूक उमेदवारींच्या मुलाखती घेत आहे.माजलगाव मतदार संघासाठी एकूण १० उमेदवारांनी पक्षाची सभासद नोंदणी शुल्क,राष्ट्रवादी मासिकाची वार्षिक वर्गणी व नाम मात्र पक्ष निधी रक्कम भरून आपले पक्ष कार्याच्या अहवालासह उमेदवारी ईच्छूक अर्ज सादर केलेले होते.

पक्षाच्या कार्यपध्दतीनूसार माजलगाव मतदार संघासाठी ईच्छूक उमेदवार म्हणून माजी आमदार पान २ वर...

चाळीस वर्षे पंडित काय करत होते?

राम येवले:रस्ता कांमाचे झाले उदघाटन

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मतदारसंघातील कट चिंचोली हे गाव गेवराई तालुक्यातील दैठण येथून हाकेच्या अंतरावर असणार हे गाव पंडिताच्या चाळीस वर्षाच्या सत्तेत रस्त्या पासून वंचित होते मतदार संघातील जनतेने आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांना निवडून दिले आणि आज आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्या प्रयत्नातून दैठण ते कटचिंचोली रस्त्याला निधी मंजूर होऊन कामाचे उद्घाटन करण्यात येत आहे ४० वर्ष सत्ता उभोगणाऱ्या पंडितांना जे जमले नाही ते आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी करून दाखवले त्यामुळे आमदार लक्ष्मण पवार साहेबांचे मानावे तेवढे आभार कमीच आहेत कारण गेवराई तालुक्यातील कट चिंचोली हे गाव गोदा काठावर वसलेले गाव आहे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होऊन या ठिकाणी रस्त्याची चाळणी झालेली होती कटचिंचोली येथील रस्ता करण्यात यावा यासाठी ग्रामस्थांनी आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्याकडे सातत्याने मागणी केली होती

ग्रामस्थाच्या मागणीची दखल घेत आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी यापूर्वीच कट चिंचोली ते गोंदी या रस्त्याला मंजुरी आणली होती पण महाविकास आघाडीच्या सरकार महाराष्ट्रात आले तेव्हा या सरकारने आमदार लक्ष्मण पवार यांनी मंजूर केलेले रस्ता इथून बारामतीकडे घेऊन गेले आणि पुन्हा एकदा कटचिंचोली ग्रामस्थांचा भ्रम निराश झाला होता पण आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी पुन्हा एकदा पाठपुरावा करून दैठण ते पान २ वर...

महायुती सरकारला तारणार नाही!

दीपक केदार :ऑल इंडिया पँथर सेनेची बैठक

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

महायुती सरकारने निवडणूक डोळ्यासमोर ठेवून आणलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आगामी विधानसभा निवडणुकीत त्यांना तारू शकणार नाही असे प्रतिपादन ऑल इंडिया पँथर सेनेचे संस्थापक अध्यक्ष दीपकभाई केदार यांनी केले. ते परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. विधानसभा मतदारसंघातून आपण निवडणूक लढवणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. शहरातील चेमरी रेस्ट हाऊस येथे पत्रकारांशी बोलताना पुढे ते म्हणाले की, दलित जोडो यात्रा या माध्यमातून राज्यातील आंबेडकरवादी समाजापर्यंत पोहोचण्याचे काम ऑल इंडिया पँथर सेनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे. राज्यातील तरुण वर्ग मोठ्या संख्येने ऑल इंडिया पँथर सेनेत प्रवेश करीत आहे. सध्या आरक्षण धोक्यात आलेले आहे. आरक्षण वर्गीकरणाच्या नावाखाली आरक्षण संपविण्याचा घाट केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टाच्या माध्यमातून घातलेला आहे. केंद्रातील सरकार आणि राज्य सरकार हे संविधान विरोधी आणि दलित विरोधी असल्यामुळे त्यांना आता घालवावेच लागेल.

राज्यात आंबेडकरवादी मतांची निर्णय भूमिका आहे. त्यामुळे राज्यभर संघटन बांधणीवर जोर देण्यात येत आहे .येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला पाठिंबा देण्यात येणार आहे. ऑल इंडिया पँथर सेनेने महाविकास आघाडीकडे ५ जागांची मागणी केलेलीआहे .डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी खुद पुना कराराच्या विरोधात जेलभरो आंदोलन कले होते. यावर ते म्हणाले की,पुना कराराच्या दुष्परिणामावर सर्वव्यापी आंबेडकरवाद्यांची पान २ वर...

वाचनालयात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन

शीलाताई उजगरे :पिंपरखेड येथे पार पडले उकर्म

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आनंदाचे जीवन जगण्यासाठी, त्यांच्या अभ्यासाचा आणि बुद्धीचा विकास होण्यासाठी,, विशेष अशा पद्धतीचे प्रयत्न करणारे पिंपरखेड येथील छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत त्यामुळे या ठिकाणचे वातावरण अत्यंत आनंदमयी आणि उत्साही दिसत आहे.

पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड येथील रहिवासी असलेले प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांच्या प्रयत्नातून पिंपरखेड येथे छत्रपती शाहू महाराज वाचनालयाची निर्मिती झालेली आहे. या वाचनालयाच्या माध्यमातून मागील अनेक वर्षापासून विविध सामाजिक उपक्रम राबवून गावातील शैक्षणिक चळवळीला गती देण्याचे काम करण्यात आलेले आहे. या वाचण्याच्या माध्यमातून केवळ पुस्तकच पान २ वर...

दोन अवैद्य कत्तलखान्यांना टाळे

दणका: उपविभागीय अधिका–यांच्या आदेशान्वये कारवाई

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील खडकत येथील अवैधरित्या सुरू असलेल्या सहापैकी दोन कत्तलखान्यांना शुक्रवारी टाळे ठोकून ताब्यात घेण्यात आले. उपविभागीय दंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशावरून जिल्हा परिषद प्रशासनाने ही कारवाई केली. देशभरात गोवंश हत्याबंदी असताना तालुक्यातील खडकत येथे अवैधरित्या गोवंशीय प्राण्यांची कत्तल करून मांस विविध मोठ्या शहरांकडे विक्रीसाठी पाठविण्यात येत होते. जवळपास अठरा अवैध कत्तलखान्यांतून हा प्रकार सुरू होता.

अवैधरित्या सुरू असलेले हे कत्तलखाने पाडण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते शिवशंकर स्वामी यांनी या संदर्भात सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे पान २ वर...

गटविकास अधिकारी यांच्या आदेशान्वये शुक्रवारी खडकत येथील सहा कत्तलखाने सील करण्याची कार्यवाही सुरू केली. सहापैकी दोन कत्तलखान्यांना सील ठोकण्यात आले असून उर्वरित चार ठिकाणी विरोध झाल्याने कारवाई तूर्तास थांबविण्यात आली. वरिष्ठांच्या आदेशानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

–अनिल करडुळे,
ग्रामविकास अधिकारी, खडकत

ओबीसी गावामध्ये मत मागायला येऊ नका

प्रदीप घुले:समाज म्हणाला भूमिका स्पष्ट करा

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार नमिता मुंदडा यांनी गेल्या एक वर्षात ओबीसी आरक्षणाचा विषय चालु आहे या विषयावर आमदार नमिता मुंदडा यांनी साधी प्रतिक्रिया ही दिली नाही किंवा पाठिंब्याचे पत्र सुद्धा दिला नाही त्यामुळे केज मतदार संघातील ओबीसी समाज सध्या आमदारा नमीता मुंदडा यांच्या वर खूप नाराज आहे सध्या ओबीसी आरक्षण बचाव करण्यासाठी लक्ष्मण हाके व वाघमारे आबा उपोषण करीत आहे.

आमदार नमिता मुंदडा यांनी यावर आज परंतु आमदार म्हणून कुठलीही भूमिका स्पष्ट केलेली नाही जर तुम्ही ओबीसी आरक्षणा विषयाची भूमिका जर स्पष्ट करणार नसाल तर येणाऱ्या विधानसभेमध्ये तुम्हाला ओबीसी समाजाचे एकही मत मिळणार नाही अशी भावना ओबीसी समाज करत आहे मतदार संघाचे पान २ वर...

डॉ.योगेश क्षीरसागर — नाळवंडीत ४० शाळांना संगणक वाटप

रोजगार मिळवून देण्यासाठी आग्रही

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

देशभरात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होत आहे. स्पर्धेच्या युगात आपल्या विद्यार्थ्यांना टिकायचे असेल तर दर्जेदार शिक्षण देणे काळाची गरज बनली असून ती आपली जबाबदारी आहे. आपल्या शिक्षण संस्थांमध्ये तरुणांना रोजगार मिळवून देणारे विविध अभ्यासक्रम आणण्यासाठी आपण कायम आग्रही असतो, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले आहे.

बीड तालुक्यातील नाळवंडी येथील निवासी आश्रमशाळेत शुक्रवारी (दि.५) जिल्हा परिषद गटातील ४० शाळांना संगणक संच वाटपाचा कार्यक्रम झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच ड.राजेंद्र राऊत हे होते. व्यासपीठावर अरुण लांडे, सुधीर काकडे, पंचायत समितीचे माजी सदस्य अच्युतराव शेळके, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, युवा नेते अशोक वाघमारे, माजी नगरसेवक रमेश चव्हाण, सुनिल सुरवसे, विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, माजेद कुरेशी, सरपंच भारत कानडे, सरपंच रवी गंगावणे, सरपंच तेजाब चव्हाण, अशोक वैद्य, बाबासाहेब शिंदे, शाम राऊत, बाळासाहेब डोळस, संजय काळे, बाळराजे राठोड, भगीरथ बांडे, मिलिंद ठोकळ, अभिमान गुंदेकर, प्रा.अमोल घुमरे, बाळू आमटे आदींची उपस्थिती होती.

डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, माझे सहकारी भाऊसाहेब डावकर यांच्या पुढाकारातून सामाजिक बांधिलकी म्हणून खाजगी कंपनीच्या सामाजिक दायित्व निधीतून ४० संगणक संच जिल्हा परिषद शाळांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना शाळेतच तांत्रिक शिक्षण मिळेल. त्यातून विद्यार्थी अभ्यासू होतील. बीड विधानसभा मतदारसंघात स्व.केशरकाकू क्षीरसागर यांनी शिक्षण संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा आणली. या क्षेत्रात अलीकडे अमुलाग्र बदल झाले आहेत. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना पान २ वर...

केजमध्ये बौद्धांना नेहमीच डावलले!

चर्चा : राज ठाकरे निष्ठावंताला न्याय देतील का?

अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून सर्व हावशे गवशे नवशे गुडघ्याला बाशिंग बांधून निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत.सर्वांना वाटत आहे की यावेळी मीच बाजी मारणार म्हणून रात्रंदिवस मतदार संघात पायाला भिंगरी बांधून फिरताना दिसत आहेत.केज – अंबाजोगाई विधानसभा मतदार संघ हा गेली ४० वर्ष अनुसूचित जाती साठी राखीव आहे.या मतदारसंघाने विविध आमदार दिले मात्र या मतदार संघात आंबेडकरी किंवा बौद्ध समाजातील व्यक्ती आमदार आजपर्यंत तरी झाला नाही. अस नाही की तो निवडून येऊ शकत नाही. पण त्याला कारण ही तसेच आहे प्रस्थापित पक्षाने बौद्ध समाजातील व्यक्तीला उमेदवारी कधी दिलीच नाही.जय भिम पेक्षा राम राम बरा म्हणून कायम आंबेडकरी समाजाच्या कोपराला गूळ लावला गेला आणि त्यांच्या मतावर डल्ला मारत आले आहेत.ना कोणत्या आंबेडकरी नेत्याने प्रस्थापित पक्षाला याबाबत विचारणा केली ना आंबेडकरी समाजाने विचारणा केली फक्त आली निवडणूक की बटन दाबायच आणि जो कोणी उमेदवार निवडून येईल त्याच्या मिरवणुकीत आनंदोत्सव साजरा करायचा.निवडून आलेल्या आमदाराने यांच्याकडे ढुंकूनही पहायचं नाही पान २ वर...